७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये


# महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी लढा सुरूच राहणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक




मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी महाराष्ट्र शासन सीमाभागातील मराठी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरूच राहतील. सीमाभागातील मराठी बांधवांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विधानभवन येथे महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक झाली, बैठकीस उच्चअधिकार समितीचे सदस्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राज्यसभा सदस्य शरद पवार, लोकसभा सदस्य नारायण राणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार जयंत पाटील, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, सचिन कल्याण शेट्टी, रोहित आर. पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, शशिकांत शिंदे, आमदार शिवाजी पाटील, गोपिचंद पडळकर, सदाभाऊ खोत उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात अनेक वर्षांपासून सातत्याने संघर्ष सुरू आहे. मा. सर्वोच्च न्यायालयातील सीमाप्रश्नाची सुनावणी लवकर सुरू व्हावी यासाठी वरिष्ठ कायदेतज्ज्ञ नेमणार असून कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांच्या संदर्भात त्यांना सक्षम कायदेशीर मदत उपलब्ध करून देणार आहे. सीमाभागातील मराठी बांधवांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. समितीने मांडलेल्या सर्व सूचना आणि प्रलंबित मुद्द्यांवर शासन आवश्यक ती कार्यवाही करण्यास तयार आहे. भाषिक अल्पसंख्याकांच्या आयोगाबाबतची सर्व माहिती संकलित करून महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पाठविण्यात येईल,जेणेकरून हा विषय संसदेत प्रभावीपणे मांडता येईल, असे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयातील सीमाप्रश्नाची सुनावणी लवकर सुरू व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या वतीने आवश्यक अर्ज दाखल करण्यात येतील. तसेच या प्रकरणासाठी आवश्यकतेनुसार वरिष्ठ विधिज्ञांची नियुक्ती करण्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल. शासनाचे वरिष्ठ कायदेतज्ज्ञही या प्रकरणात सक्रिय भूमिका बजावतील.कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांच्या संदर्भात त्यांना सक्षम कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन वकील नियुक्त करेल. या खटल्यांसाठी लागणारा खर्च महाराष्ट्र शासन उचलेल. या मंत्री समितीमार्फत समन्वयाची प्रभावी यंत्रणा उभी करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. खासदार नारायण राणे म्हणाले की, महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनी विविध उपाय सुचविले आहेत. या विषयावर मार्ग काढणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. आमदार जयंत पाटील, आमदार भास्कर जाधव, ॲड. शिवाजी जाधव,महाधिवक्ता मिलिंद साठे, तज्ज्ञ समिती सदस्य दिनेश ओऊळकर, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्याध्यक्ष मनोहर किणेकर, प्रकाश मरगाळे यांनी आपली मते मांडली.

यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, महाधिवक्ता मिलिंद साठे, ॲड. शिवाजी जाधव, सहायक वकील संतोष काकडे, तज्ज्ञ समिती सदस्य दिनेश ओऊळकर, प्रकाश मरगाळे, महेश बिर्जे, ॲड. र.वि. पाटील, तसेच मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्याध्यक्ष मनोहर किणेकर, उपस्थित होते.

### सीमा भागातील प्रश्नाबाबत शासन संवेदनशील : शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र –कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक जनतेच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्र शासन संवदेनशील असून हा प्रश्न सोडविण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात हा निर्णय घेण्यात येईल. सीमा भागातील नागरिकांसाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रात पाच टक्के राखीव जागा, अभियांत्रिकी प्रवेशासाठी राखीव जागा तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाकडूनही प्रवेशासाठी जागा राखीव ठेवण्यात येतात असे त्यांनी सांगितले.

# “पोलीस म्हणून नोकरीला लावतो”

## बारामतीत दोन पोलिसांचा तरुणीवर अत्याचार



मुंबई (दै. संध्या)

जनतेच्या सुरक्षेची काळजी असलेले पोलीसच जर आमिष दाखवून अब्रूचे लचके तोडत असतील तर...? बारामतीत अशीच एक घटना घडली आहे. एका तरुणीला पोलीस दलात नोकरीला लावून देतो म्हणत दोन पोलिसांनी बलात्कार केला. यात एक आरोपी मुंबई पोलीस दलात कार्यरत आहे. पोलिसांच्या बँड्स पथकात किंवा पोलीस दलात भरती करून देतो असे सांगून दोन पोलिसांनी एका तरुणीला जाळ्यात ओढले. लैंगिक अत्याचार प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार आणि बँड पोलीस कॉन्स्टेबल मारूती करे यांच्यावर बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार हे दौंड येथील राज्य राखीव पोलीस कार्यरत असून, दुसरा आरोपी मारुती करे हा मुंबई बँड पोलीस दलात कॉन्स्टेबल आहे. पीडित तरुणीने अत्याचार केल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. पण, पोलिसांनी तक्रारीची दखल घेतली नाही. त्यामुळे तरुणीने थेट न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला.

# संत तुकाराम महाराजांची पालखी संचेती चौकात दाखल

## विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल... ॥ पुण्यात भक्तीमय वातावरण




पुणे (दै. संध्या)

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी पुण्यातील संचेती चौकात दाखल होताच परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. “ज्ञानोबा माऊली तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल” या जयघोषाने संचेती चौक आणि पालखी मार्ग दुमदुमून गेला. संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे शहर सज्ज झाले असून, प्रमुख मार्गांवर भाविकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. वारकऱ्यांच्या मुखातून “पांडुरंग पांडुरंग, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल” असा नामघोष सुरू होता.

तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात, तर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात होणार आहे. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. गर्दी नियंत्रण, दर्शन रांगा आणि वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पालखी मार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. भाविकांच्या स्वागतासाठी भव्य मंच उभारण्यात आले असून, पालखी मार्गावर विविध सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्यांनी आकर्षक पायघड्या घालण्यात आल्या आहेत. यंदाच्या पालखी सोहळ्याची प्रमुख जबाबदारी विश्वस्त विक्रमसिंह उमराज मोरे-देहूकर, उमेश सुरेश मोरे आणि लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात येत आहे. दरम्यान, राष्ट्रीय कला अकादमीच्या वतीने संचेती चौकात ‘पोलिसांना सहकार्य करा’ हा संदेश देणारी विशेष रांगोळी साकारण्यात आली. अकादमी मागील सात ते आठ वर्षांपासून पालखी सोहळ्यात सेवा म्हणून रांगोळीच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत आहे. पुण्यातील विविध रस्त्यांवरही नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी अशा संदेशात्मक रांगोळ्या तयार केल्या जात असल्याचे अकादमीच्या प्रतिनिधींनी सांगितले. “जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले; तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा,” या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळींप्रमाणे वारकरी परंपरेचा समतेचा आणि सेवाभावाचा संदेश पालखी सोहळ्यातून देण्यात येत आहे. पालखी सोहळ्यामुळे पुण्यात वारकरी, भाविक आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, प्रशासनाने नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




### ‘मिसिंग लिंक’ आणि राम मंदिर चोरीवरून राज ठाकरेंची महायुती सरकारवर सडकून टीका

# मुख्यमंत्र्यांची विधानसभेत बघून घेईनची भाषा कशी?



मुंबई (दै. संध्या)

"पुणे-मुंबई एक्स्प्रेसवेवरील 'मिसिंग लिंक'च्या मुद्द्यावरून विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'देख लुंगा' अशी भाषा वापरतात आणि चक्क हिंदीतून बोलतात. तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात, समोर बसलेले आमदार मराठी आहेत, मग तुम्ही विधानसभेत हिंदीतून कुणाला दम देत आहात? दिल्लीत बसलेल्या तुमच्या पक्षातील वरिष्ठांना संदेश द्यायचा आहे का?" अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर सडकून टीका केली.

महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त आणि कार्यालयाच्या तसेच लोगोच्या अनावरण सोहळ्यात राज ठाकरे बोलत होते. यावेळी त्यांनी रेल्वेतील परप्रांतीयांची भरती, राम मंदिरातील कथित चोरी आणि 'मिसिंग लिंक'वरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मिमिक्री करत राज्य व केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला.

विधानसभेत मिसिंग लिंकवरील चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराचा राज ठाकरेंनी खरपूस समाचार घेतला. राज ठाकरे म्हणाले, “विधानसभेत मुख्यमंत्री म्हणतात की जर कोणी राजकारण करत असेल तर आम्ही बघून घेऊ. अरे, तू मुख्यमंत्री आहेस ना? बघून घेईन काय म्हणतोस? बरं, हे बोलून झाल्यावर ते लगेच हिंदीत बोलू लागले की 'मिसिंग लिंक के बारे में अगर कोई राजनीती करे...' तुम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेत हिंदीतून का बोलताय? तुम्हाला कुणाला दाखवून द्यायचे आहे?” राज्यात आणि शहरांत सुरू असलेल्या विकासकामांच्या विचक्यावर त्यांनी संताप व्यक्त केला.

राज ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील भाषणाची मिमिक्री करत त्यांच्या दाव्यांची खिल्ली उडवली. "मिसिंग लिंकच्या ठिकाणी खांब कोसळला, पाणी गळत आहे आणि यावर लोक बोलले की फडणवीस म्हणतात 'माझ्यावर टीका करा, पण महाराष्ट्राचा अपमान सहन करणार नाही.' वा रे वा! लोकांनी प्रश्न विचारले तर तो महाराष्ट्राचा अपमान कसा? काहीही झाले की देशविरोधी आणि आता महाराष्ट्र विरोधी ठरवायचे? तुम्ही दुसऱ्यांची सरकारे असताना जी आंदोलने केली, ती काय होती?" असा सवाल त्यांनी केला. "विरोधकांनी प्रश्न विचारले की एका मंत्र्याने सांगितले की ते पाणी 'नैसर्गिक' आहे. उद्या तुम्ही विरोधी पक्षात जाल, तेव्हाही अशा घटना घडल्यावर 'नैसर्गिक' आहे असेच सांगणार का? तुमचे सरकार आहे म्हणून सगळं नैसर्गिक आणि दुसऱ्यांचे असले की राजकारण?" असा टोला त्यांनी लगावला. अयोध्येतील राम मंदिरात दानपेटीतून चोरी झाल्याच्या प्रकरणावरही राज ठाकरेंनी सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला खडेबोल सुनावले. "राम मंदिरात 400 कोटी रुपयांच्या चोरीचा आकडा समोर येतोय. लोकांनी श्रद्धेने दिलेल्या पैशांची तिथे चोरी होतेय आणि यावर आम्ही बोललो की काल कोणीतरी होसबळे म्हणाले, 'धर्मविरोधी लोक अफवा पसरवत आहेत.' चोरीवर बोललो तर आम्ही धर्मविरोधी कसे? तिथे चोरी झाली यात धर्म कुठे आला?"

"जर तिथे दुसऱ्या कुणाचे सरकार असते आणि अशी चोरी झाली असती, तर भाजपने, आरएसएसने आणि विश्व हिंदू परिषदेने मोर्चे काढले असते. राम मंदिराच्या 15 ट्रस्टींपैकी 12 जण केंद्र सरकारने नेमलेले आहेत आणि ते आरएसएस-भाजपशी संबंधित आहेत. मग तिथे चोरी होतेच कशी?" असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी मनसेच्या रेल्वे कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना राज ठाकरेंनी 2008च्या रेल्वे आंदोलनाची आठवण करून दिली. "2008 मध्ये आपण रेल्वे भरतीवरून जे आंदोलन केले, ते कधीही विसरू नका. त्यावेळी महाराष्ट्रातील नोकऱ्यांच्या जाहिराती उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये छापल्या जायच्या. त्या आंदोलनामुळे माझ्यावर 110 केसेस पडल्या, अनेकांना जेलमध्ये जावे लागले. पण त्यानंतर ममता बॅनर्जी रेल्वेमंत्री असताना त्यांनी आपला प्रश्न समजून घेतला आणि रेल्वेच्या परीक्षा स्थानिक भाषांमध्ये देण्याचा निर्णय झाला."

# फनेल झोन आणि मिलिटरी ट्रान्समीटर स्टेशन निर्बंध

## बाधित इमारतींच्या पुनर्विकासाला गती द्या



■ विमानतळ फनेल झोन आणि जुहू मिलिटरी ट्रान्समीटर स्टेशन निर्बंध बाधित इमारतींबाबत बैठक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या फनेल झोनमधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचे बदल केले आहेत. या फनेल झोनमध्ये सांताक्रूझ, विले पार्ले, कुर्ला येथील इमारतींचा समावेश आहे. या इमारतींच्या पुनर्विकासाला संबंधित यंत्रणांनी गती द्यावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत विधान भवन येथे आयोजित बैठकीत दिले. यासोबतच जुहू येथील मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन निर्बंधाने बाधित असलेल्या इमारतींचाही पुनर्विकास कार्यवाहीला वेग द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीला सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार अमित साटम, आमदार पराग अळवणी, अपर मुख्य सचिव (नगर विकास) असीम कुमार गुप्ता, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, फनेल क्षेत्रातील निर्बंध बाधित इमारतींच्या संदर्भात चटई निर्देशांक (एफएसआय) चे ‘पोटेन्शिअल’ कुठे द्यायचा आहे, याबाबत महापालिकेने निर्णय घ्यावा. देण्यात येणारा चटई निर्देशांक कुठे वापरायचा आहे, याबाबत ठरविण्यात यावे. रस्ता रुंदीकरणाच्या प्रमाणे उच्च चटई निर्देशांक लगतच्या किंवा जवळील बांधकामात एकत्र करू शकता येईल का याबाबत पडताळणी करावी. बाधित इमारतींच्या पुनर्विकासासाठी रस्त्याच्या रुंदीनुसार उच्चस्तरीय ‘पोटेन्शिअल’ असणारा चटई निर्देशांक देण्यात यावा.

मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण, म्हाडा, सिडको अशा विविध यंत्रणांच्या माध्यमातून गृहनिर्माणाचे कार्य होत असते. या संपूर्ण यंत्रणांचे नियमन व नियंत्रण नगर विकास विभागाने करावे. फनेल झोन निर्बंध बाधित इमारतींच्या पुनर्विकासाबाबत महापालिकेने ‘मॅपिंग’ करावे. जुहू येथील मिलिटरी ट्रान्समिशन निर्बंध असलेल्या इमारतींची पुनर्विकास कार्यवाही गतीने पूर्ण करावी. बाधित इमारतींच्या पुनर्विकासासाठी उच्च चटई निर्देशांक देऊन बांधकामाच्या एकत्रीकरणाला (क्लबिंग) मान्यता द्यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# संपादकीय

## ‘अ’ आंदोलनाचा...

सगळीकडे शाळा प्रवेशांचा उत्सव सुरू असताना, गडचिरोलीतील शाळांसमोर विद्यार्थी ‘अ’ आंदोलनाचा गिरवत होते.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शाळेचा पहिला दिवस खास असतोच. मूल पहिल्यांदा जेव्हा शाळेत जाते, तेव्हा ते हमखास रडते. केविलवाणा चेहरा करते. ‘उद्यापासून आमच्या बाळाची शाळा आहे’ म्हणत आईने त्याच्या मनाची कितीतरी तयारी करून घेतलेली असो. शाळेच्या दारावर ते आपल्या नाजूक बोटांनी पालकांचे बोट इतक घट्ट पकडून ठेवते, की सोडवताना बापसुद्धा गलबलतो. रडत रडत शाळेत जाणे, थोड्या वेळात शांत होणे, मग इतर मुलांशी खेळणे हाच त्यांचा पहिला धडा. एक-दोन दिवस शाळा नको वाटते. नंतर मात्र मूल शाळेला सोडत नाही. पुढे पुढे शाळांना सुटी लागल्यानंतर पुन्हा केव्हा एकदा शाळा भरते याची वाट बघत असते. शाळेच्या पहिल्या दिवसाला कोऱ्या वह्या-पुस्तकांचा सुगंध सोबत घेऊन जुन्या मित्रांना भेटून त्याला वेगळीच ऊर्जा मिळते.

विदर्भातील कडक उन्हाळा, उशिराचा मान्सून यामुळे शाळा उशिरा सुरू होतात. यावेळी त्या ३० जूनला झाल्या. पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव साजरा झाला. कुठे शिक्षण राज्यमंत्री उपस्थित होते, कुठे लोकप्रतिनिधींनी, सेलिब्रेटींनी मुलांचे स्वागत केले. कुणाला गुलाब पुष्प मिळाले, कुणाच्या हातावर मिठाई आली. वर्ग सुरू झाले तेव्हा कुणी ‘अ’ अननसाचा गिरवला असेल, तर कुणी ‘ए फॉर ॲप्पल’ म्हटले असेल. ‘स्टील सिटी’ म्हणून जगाच्या नकाशावर आपले नाव कोरण्यासाठी तयार असलेल्या गडचिरोलीत मात्र वेगळीच शाळा भरली. वेगळेच धडे मिळाले. वेगळीच अक्षरे गिरवली गेली. गडचिरोली शहरापासून अवघ्या पंधरा किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या हिरापूर, गुरवळा आणि राखी या गावांत प्रवेशोत्सवासाठी शिक्षक शाळेत हजर होते. शाळेची वेळ झाली. घंटा वाजली, पण मुले आलीच नाहीत. थोडे समोर बघितले तर ती आपल्या पालकांसोबत आंदोलन करीत होती. गडचिरोलीत होणाऱ्या विमानतळास इंचभरही जागा देणार नाही म्हणून घोषणा देत होती. शाळेच्या पहिल्या दिवशी ‘अ’ आंदोलनाचा गिरवत होती. आजवर महाराष्ट्रातला मागास जिल्हा म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली हा कामचुकार अधिकाऱ्याला बदलीची धमकी देण्याइतपत बदनाम होता. माओवाद संपला. उद्योगांचे पर्व सुरू झाले. गुणवत्ताप्रधान मँगनीज खनिजामुळे गुंतवणूक वाढली. ‘शेवटचा जिल्हा म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली आम्ही महाराष्ट्रातील पहिला जिल्हा करू’, अशा घोषणा सरकार करीत आहे. त्यामुळे त्या भागाला विकासाची आस लागली आहे. उद्योजकांना, गुंतवणूकदारांना तिथे विमानतळ हवे आहे. त्यासाठी सरकारला त्यांच्या जमिनी हव्या आहेत. ज्यांचे आयुष्य त्या शेतीवर अवलंबून आहे, ते त्या द्यायला तयार नाहीत. त्यासाठी विनंती, निवेदने, चर्चा यांच्या फेऱ्या झडल्या. जूनच्या पहिल्याच आठवड्यात गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे आंदोलन केले होते. पुढचे दोन महिने भूसंपादनाची कुठलीही कार्यवाही होणार नाही, असे प्रशासनाने कळविले असताना अचानक ३० जूनला विमानतळ प्राधिकरणाने वन जमिनीच्या सर्वेक्षणासाठी कंपनी नियुक्त करण्याची निविदा काढली. त्यामुळे शेतकरी चिडले. पाऊस पडत असताना, भातलावणीचे दिवस असताना, मुले शाळेत पाठविण्याची वेळ असताना, त्यांनी शाळेच्या समोर मुलांना सोबत घेऊन आंदोलन केले. गावात रेल्वे व्हावी, विमान उडावे यासाठी जागोजागी आंदोलने होत असताना, तुमच्या गावात होणारे विमानतळ तुम्ही का थांबवता, विकासाला का विरोध करता, सगळे जग मुलांनी शिकावे म्हणून धडपडत असताना, तुम्ही त्यांच्या शाळा का बंद करता, या प्रश्नांच्या फौजेला त्यांच्याकडे भावनिक तटबंदी आहे. ते म्हणतात, ‘आमचा विमानतळास विरोध नाही. ते आमच्या जागेवर होऊ नये. आमच्याजवळ शेतीच राहणार नाही तर आम्ही काय खाणार, कसे जगणार, कसे शिकणार?’ जगण्या आणि शिकण्यामधील या द्वंद्वाकडे तटस्थपणे कसे बघावे? हा विमानतळ आणि शेतीमधला संघर्ष नव्हे! तो दोन कल्पनांमधील फरक आहे. सरकार उद्याचा विकास बघते, शेतकऱ्याला उद्याच्या निर्वाहाची चिंता आहे.

## गुरु वचन

### आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्याात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्याात्मिक धनाचा धनी आहे. शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल. अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्याात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळावायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन-मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे. भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत. येशू ख्रिस्तानेही म्हटले की, एकवेळ सूईच्या छिद्रातून ऊंट जाईल. मात्र श्रीमंत माणूस स्वर्ग प्राप्त करू शकत नाही. स्वर्ग न मिळण्याचा अर्थ आहे, ईश्वराची कृपा प्राप्त नसणे. त्याचे कारण जेव्हा खूप धन येते व्यक्ती धन सांभाळणे आणि त्याच्या सुरक्षेबाबत सदैव चिंतित असतो. ईश्वरासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. आणि भक्ती भावनाही नसते. धनाच्या अहंकारात व्यक्ती ईश्वरीय सत्तेलाही आव्हान देऊ लागतो. तीर्थस्थळांस पर्यटन स्थळ मानून त्याचा अपमान करतो. त्यामुळे अध्याात्मिक धन आणि सांसारिक धन एकत्र मिळू शकत नाही, असे म्हटले जाते.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १००६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | | | | 7 | 6 | 1 | |
| | 4 | 8 | | 9 | | 3 | | |
| 3 | 6 | 1 | 5 | | 2 | | | |
| 8 | 3 | | | | | 9 | | 2 |
| | | | | 6 | | | | |
| 1 | | 9 | | | | | 6 | 7 |
| | | | 2 | | 3 | 8 | 4 | 6 |
| | | 4 | | 1 | | 2 | 7 | |
| | 2 | 3 | 7 | | | | 9 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १००५ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 5 | 6 | 3 | 1 | 2 | 9 | 4 |
| 4 | 1 | 2 | 9 | 7 | 8 | 3 | 6 | 5 |
| 3 | 6 | 9 | 4 | 5 | 2 | 1 | 7 | 8 |
| 2 | 3 | 4 | 5 | 9 | 7 | 8 | 1 | 6 |
| 1 | 5 | 6 | 8 | 4 | 3 | 7 | 2 | 9 |
| 9 | 7 | 8 | 2 | 1 | 6 | 4 | 5 | 3 |
| 5 | 2 | 1 | 3 | 8 | 9 | 6 | 4 | 7 |
| 6 | 9 | 3 | 7 | 2 | 4 | 5 | 8 | 1 |
| 8 | 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 3 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२१२ – लंडन शहराचा मोठा भाग प्रचंड आगीच्या भक्ष्यस्थानी.
- १५८४ – ऑरेंजच्या विल्यम पहिल्याची राहत्या महालात हत्या.
- १६८५ – इंग्लिश गृहयुद्ध – लँगपोर्टची लढाई.
- १७७८ – अमेरिकन क्रांती – फ्रांसने युनायटेड किंग्डम विरुद्ध युद्ध पुकारले.
- १७८९ – अलेक्झांडर मॅकेन्झी मॅकेन्झी नदीच्या मुखाशी पोचला.
- १७९६ – कार्ल फ्रीडरिक गॉसच्या सर्वप्रथम लक्षात आले की कोणताही आकडा जास्तीत जास्त तीन त्रिकोणी आकड्यांची बेरीज असतो.

### राष्ट्रीय

- २००६ – भारताचा इन्सॅट-४ सी या आधुनिक संचार उपग्रहाचे प्रक्षेपण अयशस्वी झाले.
- २००८ – पोलिसांनी चेन्नई किनारपट्टीवर चेन्नईवरून मेलेशियात तस्करी करण्यात येणारे सुमारे दीड कोटी किमतीचे हिरे हस्तगत केले.


### जन्म

- १४१९ – गो-हानाझोनो, जपानी सम्राटचा जन्म.
- १४५२ – जेम्स दुसरा, स्कॉटलंडचा राजाचा जन्म.
- १८५६ – निकोला टेसला, वैज्ञानिकचा जन्मचा जन्म.
- १८६७ – मॅक्सिमिलियन, जर्मनीचा चान्सेलरचा जन्म.
- १९१३ – पद्मा गोळे, आधुनिक मराठी कवयित्रीचा जन्म.

### निधन

- १३८ – हेड्रियान, रोमन सम्राट यांचे निधन.
- ११०३ – एरिक पहिला, डेन्मार्कचा राजा यांचे निधन.
- १२९८ – लाडिस्लॉस चौथा, हंगेरीचा राजा यांचे निधन.
- १४८० – रेने पहिला, नेपल्सचा राजा यांचे निधन.
- १५५९ – हेन्री दुसरा, फ्रांसचा राजा यांचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १००६



**आडवे शब्द**

१. आधार
४. हटकून, ठरवून
६. विकास पावणारे (राष्ट्र)
१०. फळातील द्रव
११. जुगाराचा एक प्रकार, माठ
१२. निकट, शेजारी
१३. आजाराची चिन्हे
१४. मौज, गंमत
१५. अडत्या
१६. मीठाची चव
१८. रोग्यास रक्त देणे
१९. एक श्वासरोग
२१. पत्रातील ’साष्टांग नमस्कार विनंतर विशेष’
२४. मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगाचे गाव
२८. संशय (हिंदी)
३०. सतत भटकण्यात आनंद मानणारा
३१. तपश्चर्या, तपस्या
३३. परिस्थिती
३५. देवाचे गाणे
३७. सुटकेचा मार्ग
३९. जंगल, वन
४०. वर्तुळ
४१. किंचित वक्रता
४२. अधाशीपणा
४४. विनोबांची सुबोध मराठी भगवद्गीता
४६. बाज विणण्याची पट्टी
४८. वजनकाटा
५०. मऊ
५२. नामशेष
५३. चोराच्या उलट्या बोंबा!
५५. नमुनेदार
५८. तांबडा, किंचित लाल
५९. पातळ खांब
६१. युक्ती
६३. बाळभाषेत पाणी
६५. शरीर
६६. हास्य लकेर पसरणे (वा.प्रा.)
६८. खुंटी, मेख
६९. डावा
७१. मित्र, दोस्त
७२. भविष्यकथनाचा एक प्रकार
७३. जोम, मस्ती
७५. लग्नातील नवरामुलगा
७८. लगतचा
८१. प्रकरण, घोटाळा, लफडे
८२. बद्दल

**उभे शब्द**

१. लिहिता वाचता न येणारा
२. ढीग
३. मुस्लिमांचा उपवासाचा महिना
४. मजुरांवरील अधिकारी
५. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
६. मिठी, घेराव
७. समतल
८. शीलवंत
९. लाख
१४. माकडांना खेळविणारा
१७. करमणूक
२०. बागवान
२१. संगत
२२. अनेक, नाना
२३. नाजूक
२४. पराजय
२५. शत्रू
२७. श्रीफळ
२८. ताजमहल बांधणारा राजा
२९. मनाचा ओढा
३०. पाठवणी
३१. आंब्याची पोळी
३२. नेता
३४. हिंदीत हिरवा
३६. नेत्रकटाक्ष
३७. वेतन
३८. सवाद्य
४१. हिंदीत केस
४३. नवरदेवास घालण्याचा हार
४५. श्रीमंत
४७. भांडण
४९. पोपट, राघू
५१. चर्चा
५२. निरर्थक बडबड
५४. हद्दपार
५६. इंग्रजीत धडा, अभ्यास
५७. नियमित पौष्टिक खाणे
६०. पहाटेची गाढ झोप
६१. ----- निखंज, माजी अष्टपैलू क्रिकेट खेळाडू
६२. सापाची एक जात
६३. चावट विनोद
६४. मत्सर
६६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६७. सारखा
७०. चिंतन
७१. आठवणी (हिंदी)
७४. डोलदार चालीचा महाकाय प्राणी
७६. तमाशा
७७. विपत्तीची कहाणी
७९. रंग
८०. किल्ली

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. १००५ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.यथा राजा तथा प्रजा ६.सरमिसळ १०.वर ११.नगर १२.तवा १३.वरण १५.समानता १७.भाल १८.रस १९.कामा २०.टरटर २१.सजग २२.शपथ २४.बराख २७.नीट २८.तीर २९.काळीज ३०.वापर ३२.काच ३४.काळा ३५.वजन ३६.जरतर ३७.कलप ३८.बनावट ३९अ.की ४०.काका ४१.परकायाप्रवेश ४४.कोंबडा ४६.सुवास ४८.रोमण ४९.गळ ५१.वगार ५२.मिलाप ५३.कात ५४.माला ५५.पाल ५६.लोक ५७.कामना ६०.शिरकाव ६२.कणेर ६४.लड ६५.ठिक ६६.फणस ६९.कसर ७२.चकाकी ७३.वारा ७५.नर ७६.थापाडया ७७.मार ७८.खणखणीत

उभे उत्तर : १.यथावकाश २.मारीच ३.जार ४.थाटमाट ५.जाणता ६.सरबत ७.मितभाशी ८.सवाल ९.सरसगट १४.रमापती १५.सरस १६.नरबळी १८.रजनीचर २३.थरकाप २५.राजवट २६.साप २९.कामना ३०.वाण ३१.रज ३२.कातर वेळ ३३.एकलकोंडा ३८.बकासुर ३९.मकान ४१.परोपकारी ४२.रम ४३.प्रगतशील ४५.डावलणे ४७.समीकरण ५०.तलाव ५४.माका ५५.पाककला ५८.मकान ५९.नामा ६१.रडकथा ६६.फकीर ६७.सवा ६८.करणी ७०.सपान ७१.रडया ७२.चर ७४.राख ७५.नख

## उपदेशकथा

### बलाढ्याशी लढा

एकदा एका उन्मत्त हत्तीनं वृक्षाला धडक दिली. चिमणा-चिमणीचं घरटं उद्ध्वस्त होऊन खाली पडलं. त्यातली अंडी फुटून गेली. ती दोघं दु:खी झाली. हत्तीला धडा शिकवायचा होता त्यांना पण कसा, हा प्रश्न होता. त्याचं सांत्वन करायला आलेल्या माशी, बेडूक व सुतार पक्ष्यानं मिळून एक युक्ती केली. चिमणा-चिमणीला धीर दिला. आपण दुर्बल असलो तरी काय झालं? बलाढ्याशी लढा देऊ. मग ठरल्याप्रमाणे हत्तीच्या कानापाशी माशी गुणगुणली. खड्ड्याच्या टोकापाशी बेडकानं आवाज काढला. तिथे पाणी असावं म्हणून हत्तीनं तिथे पाऊल ठेवलं आणि तो खड्ड्यात पडला. सुतार पक्ष्यानं या गडबडीत त्याचा डोळा फोडला. अशारीतीने तिघांना एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने त्या बलाढ्य हत्तीला धडा शिकविला.

कथा उपदेश : थोडी युक्ती, साहस आणि एकी असेल तरी बलाढ्याशीही लढा देता येईल.

## : SMS :

3 Idiots Would Have Been a More Bigger Hit.
If Kareena Kapoor Would've Also Once Said,
.
"Jahanpanaah Tussi Great Ho, Tohfa Qabool Karo"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.७ | २४.५ |
| अहमदनगर | २६ | २२.९ |
| अकोला | ३१.२ | २६.२ |
| अमरावती | ३१.३ | २६ |
| बीड | ३७.७ | २६.४ |
| भंडारा | ३४.६ | २६.४ |
| बुलढाणा | ३५.२ | २७.३ |
| चंद्रपूर | ३८ | २६.८ |
| चेन्नई | ४२.२ | २९.७ |
| नवी दिल्ली | ३६.९ | २७.६ |
| धुळे | ३४.३ | २५.८ |
| गोंदिया | ३३.८ | २६ |
| जळगाव | २७.२ | २५.८ |
| कोल्हापूर | २६.८ | २२.९ |
| लातूर | ३१.३ | २३.५ |
| मुंबई | ३५.२ | ३०.६ |
| नागपूर | ३४.८ | २५.३ |
| नांदेड | ३४.४ | २६.१ |
| नंदूरबार | ३१.२ | २५.७ |
| नाशिक | २७ | २३ |
| पुणे | २५.१ | २३ |
| पंढरपूर | ३३.८ | २४.८ |
| सातारा | २७.३ | २१.८ |
| सांगली | ३०.२ | २३.५ |
| सोलापूर | ३४.६ | २५ |
| वर्धा | ३५.४ | २६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल. प्रवासाचे योग येतील. ताण-तणाव जाणवतील. थकवा जाणवेल.

**वृषभ :** नातेवाईकांकडून फारशा अपेक्षा नकोत. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. उमेद वाढेल.

**मिथून :** कौटुंबिक जीवनात फारसे स्वास्थ्य लाभणार नाही. कुटुंबातील व्यक्तींच्या वागण्यामुळे मनाला वेदना होतील. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**कर्क :** आर्थिक लाभाच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. उधारी-उसनवारी वसूल होईल. मात्र आर्थिक क्षेत्रात धाडस नको. वैवाहिक सौख्य लाभेल.

**सिंह :** विवाहेच्छूंचे विवाह जमतील. प्रकृतीकडे लक्ष ठेवावयास हवे. खर्च वाढणार आहेत. नोकरी व्यवसायात सुस्थिती राहील. अनेकांशी सुसंवाद साधाल.

**कन्या :** कलाकारांना व साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना सुसंधी लाभेल. आरोग्य उत्तम राहील. उत्साह वाढेल. महत्त्वाचे निर्णय नकोत.

**तूळ :** मुले मोठी असल्यास त्यांच्याशी मतभेदाची शक्यता आहे. गुंतवणुकीस दिवस चांगला आहे.

**वृश्चिक :** वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. कर्मचारी, नोकरांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाची आर्थिक कामे होतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**धनू :** मित्रांचे विशेष सहकार्य लाभेल. वाहने सावकाश व काळजीपूर्वक चालवावीत. काही व्यक्तींबाबतीत राहत्या जागेचे प्रश्न उभे राहतील.

**मकर :** अनेकांशी सुसंवाद साधाल. कामाचा ताण जाणवेल. उधारी-उसनवारी वसूल होईल. प्रवासाचे योग येतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभेल.

**कुंभ :** तुमची लोकप्रियता वाढेल. करार करण्यास दिवस चांगला आहे. नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. आर्थिक कामे सहजपणाने होणार आहेत.

**मीन :** उधारी उसनवारी वसूल करणेस हीच वेळ योग्य आहे. मनोबल व उत्साह वाढेल. मित्रांचे वागणे आपल्याला दु:ख देऊन जाईल. मनस्थिती द्विधा राहील.

## पंचांग

पंचांग
१० जुलै २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
निज ज्येष्ठशके
संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम
अयन- दक्षिणयन
मास- निज ज्येष्ठ
ऋतु- सौर वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि:दशमी ०८:१६:३६
तिथि:एकादशी
२९:२२:५७+
नक्षत्र:भरणी १३:१५:००
योग:धृति ०७:१४:१६
योग:शूल २७:५०:१३+
करण:विष्टि ०८:१६:३६
करण:बव १८:५३:२२
करण:बालव
२९:२२:५७+
सूर्य:मिथुन
चन्द्र:वृषभ१८:४४:४१
हिजरी सन् - १४४८
मुस्लिम मास - मोहरम
तारीख - २४
विशेष
योगिनी स्मार्त एकादशी
संत निवृत्तिनाथ
यात्रा - त्र्यंबकेश्वर
भाऊसाहेब वैध
पुण्यतिथी - नागपूर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महावितरणची मोबाईल चार्जिंग सुविधा योजनांच्या जनजागृतीसाठी केला चित्ररथ

पुणे (दैनिक संध्या) : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर महावितरण पुणे परिमंडलाकडून वारकऱ्यांसाठी मोबाईल चार्जिंगची मोफत सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यासाठी महावितरणने दोन वाहनांची व्यवस्था केली असून, यावर महावितरणच्या विविध योजनांच्या जनजागृतीसाठी चित्रफितीही दाखविण्यात येत आहेत. महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी नुकताच आषाढी वारीच्या कामांचा आढावा घेतला. त्यावेळी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वारी मार्गाचे व सर्व विसावा स्थळांचे 'वॉक डाऊन' सर्वेक्षण करुन विद्युत सुरक्षेची चोख उपाययोजना करण्याचे निर्देशित केले होते. त्यानुसार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी वारी मार्गावर ठिकठिकाणी महावितरण कर्मचाऱ्यांची पथके तैनात केली असून त्यांना रेडियम असलेले रेनकोट देखील देण्यात आले आहेत. वाहनांवर लावण्यात आलेल्या स्क्रीनवर प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजना, स्मार्ट सोलार योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषीपंप योजना आदी योजनांच्या तसेच स्मार्ट मीटरचे फायदे सांगणाऱ्या चित्रफिती दाखवण्यात येत आहेत. एकावेळी १०० हून अधिक मोबाईल चार्जिंगला लावण्याची सोयही याच वाहनांमध्ये करण्यात आली आहे. यामुळे वारकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. मुख्य अभियंता सुनिल काकडे व अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या हस्ते या चित्ररथांचा शुभारंभ करण्यात आला.

### कृषी सुविधा निधी योजनेचा लाभ घ्या

पुणे (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी (AIF) योजनेअंतर्गत १९ जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, प्रक्रिया केंद्रे, कस्टम हायरिंग सेंटर आदी कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येतो. वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, प्राथमिक कृषी पत संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट तसेच इतर पात्र संस्थांनी तालुका कृषी अधिकारी, आत्मा (ATMA), कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. तसेच https://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक सुरज मडके यांनी केले आहे.

### अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिकांना सुरक्षा उपाययोजनांचे निर्देश

पुणे (दैनिक संध्या) : अतिवृष्टीमुळे बांधकामस्थळी दुर्घटना होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार आणि नियोक्त्यांनी स्वतःची नियोक्ता म्हणून ims.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी, तसेच कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने व उपकरणे उपलब्ध करून सुरक्षित कामकाजाची खात्री करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जमीन खचणे, संरक्षक भिंती कोसळणे आदी संभाव्य घटनांच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या निवासस्थानी कोणताही धोका नसल्याची खातरजमा करून आवश्यक असल्यास सुरक्षित निवासाची व्यवस्था करावी. तसेच कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यासोबतच, बांधकामस्थळी कार्यरत असलेल्या अनोंदणीकृत कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे तातडीने नोंदणी करून शैक्षणिक, सामाजिक, सुरक्षा संच, अत्यावश्यक संच, वैद्यकीय तपासणी आदी कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बांधकाम कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेसंदर्भातील शासन निर्णय (दि. १३ डिसेंबर २०११) ची काटेकोर अंमलबजावणी करावी. सुरक्षा उपाययोजनांकडे दुर्लक्ष करून अपघात किंवा मनुष्यहानी झाल्यास संबंधित बांधकाम व्यवसायिक, कंत्राटदार किंवा नियोक्ता यांनाच पूर्णपणे जबाबदार धरले जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.



### 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टच्या गणेशोत्सवातील सजावटीचे वासापूजन उत्साहात

पुणे (दैनिक संध्या) : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने १३४ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त वृंदावनमधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. त्या सजावटीचा श्रीगणेशा वासापूजनाने झाला. उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे आयोजित कार्यक्रमाला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, अमोल चव्हाण, तुषार रायकर, यंदाचे कलादिग्दर्शक नितेश कुमार, काळे मांडववाले यांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, नानाविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट इतकी असेल. जिथे भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते या संकल्पनेवर आधारित ही भव्य प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये अनेक भव्य खांब असून विविध मूर्ती देखील असणार आहेत. गाभारा व मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रींचे दर्शन घेता येईल.

# लेखक हे साहित्यशारदेचे मानकरी : प्र. के. घाणेकर

## प्रसाद प्रकाशनतर्फे पांडुरंग बलकवडे, आशुतोष बापट यांना पुरस्कार प्रदान ; एकाच वेळी २४ आध्यात्मिक पुस्तकांच्या प्रकाशनाचा विक्रम

पुणे (दै. संध्या)




लेखक हे साहित्यशारदेचे मानकरी आहेत. त्यांनी आपले ज्ञान पुस्तकांच्या माध्यमातून वाचकांसमोर आणले आहे. आपल्याला आवडलेल्या पुस्तकांच्या लेखकांशी संवाद साधावा. त्या संवादातून विचारांची देवाणघेवाण होऊन आपले ज्ञान वृद्धिंगत होईल, असे मत ज्येष्ठ दुर्ग अभ्यासक आणि लेखक प्र. के. घाणेकर यांनी व्यक्त केले. प्रसाद प्रकाशन आणि अनाहत प्रकाशनच्या वतीने नवी पेठ येथील एस. एम. जोशी सभागृहात पुरस्कार प्रदान तसेच २४ पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना कै. मनोहर य. जोशी स्मृती गौरव पुरस्कार, तर भारतीय विद्यातज्ज्ञ आशुतोष बापट यांना कै. मंजिरी मनोहर जोशी स्मृती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, प्रसाद प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस उपस्थित होत्या. प्र. के. घाणेकर म्हणाले, देवावर माझी श्रद्धा आहे. माझ्यासाठी पूर्व दिशेला उगवणारा तेजस्वी सूर्य हा देव आहे. सूर्यामुळेच आपण जगतो. त्यामुळे सूर्यनारायणाला आपण देव मानतो, यामागे शास्त्रीय कारण आहे. माझा जन्म कोकणात झाला आहे. त्यामुळे समुद्र हा देखील माझ्यासाठी देवता आहे.

ते पुढे म्हणाले, हिमालयातील मुक्तिनाथ, लाहौल-स्पीती आणि काझा परिसरात आढळणारे शालिग्राम हे प्रत्यक्षात अमोनाइट प्रकारचे जीवाश्म आहेत. दगडात देव पाहायचा की देवामध्ये दगड, हा प्रत्येकाच्या श्रद्धेचा आणि दृष्टीचा विषय आहे.

पांडुरंग बलकवडे म्हणाले, आजच्या २१ व्या शतकामध्ये विज्ञान प्रगत होत आहे. त्यामुळे जगात समृद्धी येत आहे. परंतु विज्ञानाला अध्यात्माची किंवा विचारांची जोड नसेल, तर जगात जे घडत आहे ते आपण पाहत आहोत. हजारो वर्षांपूर्वी आपली संस्कृती जगाच्या गुरुस्थानी होती. उद्याही जगाला दिशा देण्याचे काम आपल्या देशातील विचारवंतांना करावे लागेल. विश्वाचे कल्याण चिंतणारी आपली संस्कृती आहे.

आशुतोष बापट म्हणाले, भारतीय संस्कृती, इतिहास आणि वारसा यांच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होत आहे. भारताचा वारसा आणि स्थापत्यवैभव जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे, ही इच्छा असून या पुरस्कारामुळे आणखी प्रोत्साहन मिळाले आहे.

डॉ. उमा बोडस म्हणाल्या, प्रसाद प्रकाशनला ८० वर्षे पूर्ण होत आहेत. केवळ पुस्तके छापणे हेच प्रकाशन संस्थेचे काम नसून लेखकांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्याची सामाजिक जबाबदारीही प्रकाशन संस्थेची असते. प्रत्येक पुस्तकामागे लेखकाची साधना असते. वाचनसंस्कृती जिवंत ठेवणे ही प्रसाद प्रकाशनची जबाबदारी असून भविष्यातही ही परंपरा अखंडपणे सुरू राहील. सुवर्णा बोडस यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## प्राथमिक आरोग्य केंद्रात अतिदक्षता सुविधा कार्यान्वित

पुणे (दै. संध्या)

आषाढी वारीनिमित्त लाखो वारकरी पुणे जिल्ह्यातून पायी मार्गक्रमण करीत असताना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विविध ठिकाणी विशेष वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अतिदक्षता सुविधा कार्यान्वित करण्यात आली असून, आपत्कालीन परिस्थितीत वारकरी तसेच इतर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि वैद्यकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन अतिदक्षता खाटांची तसेच दोन ऑक्सिजन खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे. उष्माघात, हृदयविकार, श्वसनाचा त्रास, अपघात किंवा इतर गंभीर स्वरूपाच्या आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार करता यावेत, या उद्देशाने ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या केंद्रात २४ तास सेवेसाठी आयसीयू फिजिशियन/भूलतज्ज्ञ तसेच एक फिजिशियन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, आपत्कालीन गरजेनुसार स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ आणि अस्थिरोगतज्ज्ञ हेही तत्परतेने सेवा देण्यासाठी उपलब्ध ठेवण्यात आले आहेत.

## आपत्ती व्यवस्थापन गिरीश महाजन यांची मोशी येथील घटनास्थळी भेट

### मोशी येथील दुर्घटनेतील नागरिकांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर कार्यवाही सुरू – आपत्ती व्यवस्थापन मंत्री

पुणे (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथे कचऱ्याचा ढीग कोसळून इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून आता पर्यंत सहा जणांना सुखरूप बाहेर काढले असून उर्वरित सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

मोशी येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर मंत्री श्री. महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेल्या बचावकार्याची पाहणी केली. यावेळी आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, महापौर रवी लांडगे,

■ सहा जणांना बाहेर काढण्यात यश ; तिघांशी संपर्क, उर्वरित जणांचा शोध सुरु

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.


श्री. महाजन यांनी सांगितले की, दुर्घटनेच्या वेळी इमारतीत एकूण २३ नागरिक अडकले होते. त्यापैकी इमारतीच्या वरच्या मजल्यावर असलेले ५ नागरिक स्वतःहून सुरक्षित बाहेर आले, तर बचाव पथकाने ६ नागरिकांना सुखरूप बाहेर काढले आहे. आणखी ३ नागरिकांशी संपर्क झाला असून तेही सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे. उर्वरित नागरिकांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. ते पुढे म्हणाले की, गेल्या ३० ते ३५ तासांत परिसरात ६०० मि.मी.पेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे कचरा डेपोमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. त्यामुळे कचऱ्याचा मोठा लोट इमारतीच्या दिशेने वाहून आल्याने ही दुर्दैवी दुर्घटना घडली. या दुर्घटनेतील प्रत्येक नागरिकाचा जीव महत्त्वाचा असून सर्वांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

सध्या घटनास्थळी इमारतीचा मलबा हटविण्याचे काम सुरू आहे. मात्र, जागा अत्यंत कमी असल्यामुळे बचावकार्य संथगतीने करावे लागत असून ही मोहीम रात्रभर आणि आवश्यक असल्यास सकाळपर्यंतही सुरू राहणार आहे. बचावकार्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणा परस्पर समन्वयाने कार्यरत असल्याचेही श्री. महाजन यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, बचाव पथकाने सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण आणि रणवीर सिंह यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळविले. तसेच घटना घडल्यानंतर अशोक गुप्ता, मुनेंद्र कुमार, चंद्रशेखर सिंह, दिनेश सुतार आणि श्री बाला हे स्वतःहून सुरक्षित बाहेर पडले.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा प्रशासन सतर्क

पुणे (दै. संध्या)




### बचाव, स्थलांतर आणि मदतकार्य युद्धपातळीवर

प्रादेशिक हवामान विभागाने पुणे जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केल्यानंतर जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला असून जिल्हा प्रशासनाने सर्व यंत्रणा सतर्क ठेवत बचाव, मदत व स्थलांतराची कार्यवाही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली युद्धपातळीवर सुरू ठेवली आहे.

जिल्ह्यातील १५८ महसूल मंडळांपैकी ६४ मंडळांमध्ये ६५ मि.मी.पेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्याचा सरासरी पाऊस ६९.४ मि.मी. इतका नोंदविण्यात आला आहे. मुळशी तालुक्यातील आंबवणे येथे २९६ मि.मी., आंबेगाव तालुक्यात ३१७ मि.मी., लोणावळा येथे २०२ मि.मी., कुसगाव येथे १८९ मि.मी., वडगाव मावळ, चाकण, करंजविहिरे, पाईट, पोमगाव, माले आदी भागांतही अतिवृष्टीची नोंद झाली आहे. आज दुपारी सुमारे २ वाजता मोशी येथील कचरा डेपो शेजारील तीन मजली इमारत कोसळण्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेत १५ ते १९ नागरिक अडकल्याची माहिती असून दक्षिण कमानची विशेष तुकडी, एनडीआरएफ, अग्निशमन दल, स्थानिक प्रशासन व आपदा मित्र यांच्या संयुक्त प्रयत्नातून आतापर्यंत चार जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. उर्वरित नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. अतिवृष्टीमुळे पुणे शहर, हवेली, मुळशी, भोर, मावळ, वेल्हा, जुन्नर, खेड, आंबेगाव तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातील अनेक पूल व रस्ते सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतुकीसाठी तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी दरड कोसळणे, पूल पाण्याखाली जाणे, रस्ते खचणे व रस्त्यावर माती-दगड आल्यामुळे वाहतूक वळविण्यात आली असून संबंधित विभागांकडून रस्ते पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे. पूर व पावसाचा धोका लक्षात घेऊन जिल्ह्यात विविध ठिकाणांहून नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. पुणे शहरातील येरवडा, बोपोडी, खडकी व शिवाजीनगर परिसरासह हवेली, मुळशी, भोर, मावळ, वेल्हा, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील पूरग्रस्त व धोकादायक भागांतील नागरिकांना शाळा, समाजमंदिरे, ग्रामपंचायत हॉल, संपर्क शाळा तसेच नातेवाईकांकडे सुरक्षित हलविण्यात आले आहे.

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने विविध तालुक्यांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक गतिमान केल्या आहेत. धोकादायक ठिकाणांवरील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविणे, निवारा, अन्न व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच बचाव पथके सतर्क ठेवण्यात आली आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 54 ठिकाणांहून 10,271 नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. विशेषतः जुन्नर, आंबेगाव, मुळशी, भोर, वेल्हा, मावळ, हवेली तसेच पिंपरी-चिंचवड परिसरात प्रशासनाने तातडीने कारवाई केली आहे.

### जुन्नर तालुक्यातील स्थलांतर

माळीण अंतर्गत पसारवाडी येथील 13 कुटुंबांतील 36 नागरिकांना शासकीय आश्रमशाळा, असाणे येथे स्थलांतरित करण्यात आले. तसेच काळवाडी क्र. 1 व काळवाडी क्र. 2 येथील सुमारे 45 कुटुंबांतील 225 नागरिकांना ग्रामपंचायत कार्यालय जांभोरी, अंगणवाडी, समाजमंदिर व रयत शिक्षण संस्थेच्या शाळेसह पाच सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. स्थलांतरितांसाठी जांभोरी येथे सेंट्रल किचनमार्फत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. पांचाळे खुर्द येथील 12 कुटुंबांतील 35 नागरिकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आडिवरे येथे, तर आमडे येथील 8 कुटुंबांतील 22 नागरिकांना माळीण येथील शैक्षणिक संस्थेमध्ये सुरक्षित हलविण्यात आले.

# 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात पालखींचे पुण्यात स्वागत

## महापौर मंजुषा नागपुरे यांनी कळस आणि बोपोडी येथे दोन्ही पालख्यांचे केले औक्षण

### वारकऱ्यांसमवेत फुगडीचा आनंद; 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' अंतर्गत सेवाभावाचा अनोखा संगम



> संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन हा प्रत्येक पुणेकरासाठी अभिमानाचा आणि भाग्याचा क्षण आहे. दोन्ही पालख्यांचे औक्षण करून स्वागत करताना आणि वारकरी भगिनींसमवेत फुगडी खेळताना वारीतील समता, भक्ती आणि आनंदाचा विलक्षण अनुभव घेता आला. वारकरी बांधवांची सेवा हीच संतसेवा मानून महानगरपालिकेचे सर्व विभाग 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' अंतर्गत अहोरात्र कार्यरत आहेत. स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, सुरक्षा यांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, संतांनी दिलेला समता-बंधुतेचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **– मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे महानगरपालिका**

पुणे (दै. संध्या)

आषाढातील रिमझिम सरी, टाळ-मृदुंगाचा अखंड निनाद, भगव्या पताकांनी दुमदुमलेले रस्ते आणि लाखो कंठातून घुमणारा 'ज्ञानोबा-तुकाराम' चा जयघोष... अशा भक्तिमय वातावरणात पुणे शहराने आज संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यांचे उत्स्फूर्त, भव्य आणि भावपूर्ण स्वागत केले. अवघे पुणे शहर विठ्ठलमय झाले असताना वारकरी संप्रदायाच्या भक्ती, समता आणि सेवाभावाच्या परंपरेचे पुणेकरांनी जल्लोषात स्वागत केले.

महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' उपक्रमांतर्गत दोन्ही पालखी सोहळ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून पुष्पवृष्टी करीत स्वागत करण्यात आले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे महापौर मंजुषा नागपुरे यांनी भक्तिभावाने औक्षण करत स्वागत करत पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेतल्या. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषात वारकरी महिला भगिनींसमवेत फुगडी खेळत त्यांनी वारीतील आनंद, उत्साह, समता आणि सेवाभावाचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून अनुभवला. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, विरोधी पक्षनेते अ‍ॅड. निलेश निकम, राष्ट्रवादी गटनेते सोपान सोपान चव्हाण, पक्षनेते नितीन गावडे, आयुक्त नवलकिशोर राम यांच्यासह स्थानिक नगरसेवक, पुणे महानगरपालिका अधिकारी तसेच स्थानिक नागरिक व वारकरी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' या उपक्रमांतर्गत वारकरी भाविकांसाठी पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळांवर स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तात्पुरती स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, प्रकाश व्यवस्था, अग्निसुरक्षा, आपत्कालीन प्रतिसाद पथके, नियंत्रण कक्ष आदी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेचे सर्व विभाग वारकरी भाविकांच्या सेवेसाठी समन्वयाने कार्यरत आहेत.

संतांनी दिलेला समता, बंधुता, सेवा आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारा हा उपक्रम पारंपरिक श्रद्धेला आधुनिक व्यवस्थापनाची प्रभावी जोड देत आहे. दोन्ही पालखी सोहळ्यांच्या स्वागतातून पुणे शहराने वारकरी संप्रदायाप्रती असलेली आपली श्रद्धा, आपुलकी आणि सेवाभाव पुन्हा एकदा अधोरेखित केला.

### १० जुलै रोजी सामूहिक ऑनलाईन पसायदान पठण

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदान या विश्वप्रार्थनेचा संदेश जगभरातील भाविकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून १० जुलै रोजी रात्री ९ वाजता सामूहिक ऑनलाईन पसायदान पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. विश्वबंधुत्व, मानवता आणि विश्वशांतीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात देश-विदेशातील भाविक डिजिटल माध्यमातून सहभागी होऊ शकणार असून, त्याचे थेट प्रक्षेपण www.punepratham.org या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कॅलिफोर्निया बदामांसह आपली त्वचा अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्या



मुंबई (दैनिक संध्या) : जागतिक त्वचा आरोग्य दिन साजरा केला जात असताना, यावर्षीची संकल्पना "उत्तम ज्ञान, उत्तम त्वचा आरोग्य" ही निरोगी त्वचेसाठी योगदान देणाऱ्या घटकांना समजून घेण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. त्वचेची काळजी घेण्याच्या पद्धती प्रदूषणासारख्या बाह्य ताणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आधार देऊ शकतात, परंतु निरोगी, चमकदार त्वचा राखण्यासाठी आपल्या शरीराला पोषण देण्यासाठी आपण काय निवडतो हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आवश्यक पोषक घटक प्रदान करणारा संतुलित आहार घेणे, ज्यामध्ये कॅलिफोर्निया बदाम, संपूर्ण धान्ये, वनस्पती आणि प्राणिज प्रथिने यांसारख्या त्वचेसाठी उपयुक्त पदार्थांचा समावेश असेल आणि त्यासोबत सक्रिय जीवनशैलीचा अवलंब केल्यास निरोगी त्वचा आणि एकूणच आरोग्यास मदत होऊ शकते. पोषक घटक तुमच्या त्वचेच्या संरक्षणात्मक आवरणाला, अखंडतेला आणि कार्यक्षमतेला आधार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. कॅलिफोर्निया बदाम हे असेच एक सुपरफूड आहे, जे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध आहे आणि त्यामध्ये बी जीवनसत्त्वे, झिंक, तांबे आणि आवश्यक लिनोलिक आम्ल यांसह 24 पोषक घटक असतात, जे एकत्रितपणे पेशींचे संरक्षण करण्यास आणि त्वचेच्या संरचनेला योगदान देण्यास मदत करतात. ते जीवनसत्त्व ई ने देखील समृद्ध आहेत, जे त्वचेच्या पेशींचे ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून संरक्षण करण्यास आणि कोरडेपणाशी लढण्यास मदत करते. निरोगी, तेजस्वी त्वचेला आधार देणारी आहार योजना तयार करण्यासाठी प्रथिनेयुक्त पदार्थ आणि पालेभाज्यांसोबत त्यांचा समावेश करा. आपण काय सेवन करतो याबाबत जागरूक असणे म्हणजेच त्वचेची योग्य काळजी घेणे, यावर भाष्य करताना, मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्लीच्या डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार म्हणाल्या, "तुम्ही तुमच्या शरीरात काय घेता, त्याचे प्रतिबिंब अनेकदा तुमच्या त्वचेवर दिसून येते. म्हणूनच मी माझ्या क्लायंट्सना अशा जीवनशैलीच्या सवयींवर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित करते, ज्या आतून निरोगी त्वचेला आधार देतात. संतुलित आहार, पुरेशी झोप, नियमित शारीरिक हालचाल आणि योग्य प्रमाणात पाण्याचे सेवन हे तुमच्या त्वचेचे आणि शरीराचे पोषण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. माझ्या क्लायंट्सना त्यांच्या आहारात समाविष्ट करण्याची मी शिफारस करत असलेल्या काही पदार्थांमध्ये ताजी फळे, कमी चरबीयुक्त मांस आणि कॅलिफोर्निया बदामांसारख्या निरोगी चरबीच्या स्रोतांचा समावेश आहे. जीवनसत्त्व ई आणि बायोटिनने समृद्ध असलेले कॅलिफोर्निया बदाम निरोगी त्वचा आणि केसांना आधार देतात आणि ते सहजपणे स्वतंत्रपणे किंवा जेवणात समाविष्ट करून खाता येतात, ज्यामुळे ते व्यस्त जीवनशैलीसाठी एक व्यावहारिक पर्याय ठरतात."

### 25 हजार पास्कल क्षमतेसह एल50 प्लस आणि एल50 दाखल




नवी दिल्ली (दैनिक संध्या) : घरगुती स्वच्छतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एल५० प्लस आणि एल५० ही दोन नवी रोबोटिक स्वच्छता यंत्रे बाजारात दाखल केली आहेत. परवडणाऱ्या किमतीत उच्च क्षमतेची स्वच्छता, स्वयंचलित कार्यप्रणाली आणि बुद्धिमान नियंत्रण प्रणाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत. दोन्ही मॉडेल्समध्ये २५ हजार पास्कल सक्शन क्षमता, कडा व कोपरे प्रभावीपणे स्वच्छ करणारे मॉप एक्स्टेंड तंत्रज्ञान, गालिचा ओळखून पुसणीचा भाग वर उचलणारी बुद्धिमान मॉप लिफ्ट प्रणाली, अडथळे ओळखणारी प्रगत नेव्हिगेशन व्यवस्था आणि मोबाईल अनुप्रयोगाद्वारे नियंत्रण अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. ड्रीमे इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा यांनी सांगितले की, भारतीय ग्राहक आता अधिक स्मार्ट आणि वेळ वाचवणाऱ्या तंत्रज्ञानाला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे प्रगत स्वच्छता तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याचा कंपनीचा प्रयत्न असून, एल५० मालिकेद्वारे घरगुती स्वच्छतेसाठी नवा मापदंड निर्माण होईल.

### काय हा जगद्धात्री आणि मूसामधील संघर्षाचा शेवट आहे?



नवी दिल्ली (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' मालिकेत हल्ली पार पडलेल्या भागांमध्ये शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) यांच्या लग्नसोहळ्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष विशेष वेधून घेतले. यासोबतच मालिकेत आणखी एक महत्त्वाचे कथानक उलगडत आहे आणि ते म्हणजे मूसाचा शोध घेण्यासाठी जगद्धात्रीने हाती घेतलेले धोकादायक आणि रोमांचक मिशन. मूसाचा शोध घेणे हे जगद्धात्रीसाठी आतापर्यंतच्या तिच्या प्रवासातील सर्वांत मोठ्या आणि महत्त्वाच्या मिशनपैकी एक ठरले आहे. सातत्याने धागेदोरे शोधत आणि सत्याच्या अधिकधिक जवळ पोहोचत हे मिशन आता अत्यंत निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षक जगद्धात्रीला थेट ॲक्शन मोडमध्ये पाहतील, जिथे तिचा सामना मूसासोबत होणार आहे. हा प्रसंग नाट्यमय आणि भावनिकदृष्ट्या अत्यंत प्रभावी असणार आहे. मात्र, मूसाला पकडणे हेच अंतिम ध्येय वाटत असले तरी जगद्धात्रीच्या मिशनचा तो शेवट नाही. अजूनही अनेक मोठी सत्ये पडद्याआड दडलेली आहेत आणि काही नवीन रहस्येही उलगडणार आहेत, त्यामुळे कथेत आणखी एक मोठा ट्विस्ट येणार आहे.

# गराडे धरण भरल्याने सासवडचा पाणीपुरवठा होणार नियमित

**पालखी सोहळ्याची जय्यत तयारी**

**सासवड (दै. संध्या) :**

सासवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गराडे धरणामध्ये गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे पाणीसाठ्यात ७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा मा. आनंदीकाकी चंदुकाका जगताप यांच्या हस्ते धरणाचे पूजन करण्यात आले. या पावसामुळे सासवडकरांची गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेली पाणीटंचाई दूर होणार असून, पाणीपुरवठा पुन्हा नियमित 'आडदिवसाआड' करण्यात येणार आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सासवड नगरपरिषदेने युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. पालखी सोहळ्यासाठी जादा पाणीपुरवठा केला जाणार आहे. शहरातील सर्व हातपंप दुरुस्त केले जात असून, टँकरसाठी खाजगी विहिरींची व्यवस्था करण्यात आली आहे. या विहिरींचे शुद्धीकरण व क्लोरीनेशन करण्यात येत असून,



टँकर भरण्यासाठी २४ तास कर्मचारी नियुक्त केले आहेत. पालखी तळावरील नळकोंडाळी सुस्थितीत करण्यात आली आहेत.

सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करण्यात आली आहे. 'निर्मलवारी' अंतर्गत २००० मोबाईल टॉयलेटची शहरात विविध ठिकाणी सोय करण्यात आली आहे. तसेच, स्टॉलधारकांना कचरा व्यवस्थापनासाठी डस्टबीन बॅगा पुरवल्या जाणार आहेत.

चंदनटेकडी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी, तर जेजुरी नाका येथे श्री संत सोपानकाका महाराज आणि श्री संत चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या निरोपासाठी विशेष कक्ष उभारले आहेत. पालखी तळाची स्वच्छता व सपाटीकरण पूर्ण झाले असून खडीकरण करण्यात आले आहे. शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यात आले असून, पालखी मार्गावरील राडारोडा उचलण्याचे आदेश संबंधित मालकांना देण्यात आले आहेत.

पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या असून, सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, पाणीपुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, आरोग्य सभापती राजन जगताप आणि बांधकाम सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी दिली.

## अपोलो कॅन्सर सेंटर्स बनली कॅन्सर डिटेक्शन टेस्ट करणारी श्रृंखला

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

लवकर निदान होणे ही गोष्ट रोगापासून बचाव आणि जीवनाची गुणवत्ता वाढवण्यातील महत्त्वाची गोष्ट असल्याने अपोलो कॅन्सर सेंटर्स (एससीसीज) या भारतातील आघाडीच्या आणि सर्वसमावेशक कॅन्सर केअर क्षेत्रातील सेवा प्रदाता कंपनी तर्फे आज झायडस लाईफसायन्सेस बरोबर सहकार्य करार करुन शिल्ड मल्टी कॅन्सर डिटेक्शन (एमसीडी) लॅबोरेटरीज चा विकास करण्यात येणार असून भारतातील गार्डन्ट हेल्थ (नॅसडॅक:जीएच) तर्फे ही सुविधा भारतात उपलब्ध करुन दिली जाणार आहे. एसीसीज हे अशा प्रकारच्या चाचण्या उपलब्ध करुन देणारी भारतातील पहिली केंद्रे ठरणार आहेत. एकीकडे भारतातील कॅन्सरचा ताण हा




२०४० पर्यंत २.८ दशलक्षांवर जाण्याची शक्यता असून २०२० १ च्या तुलनेत ही वाढ ५७.७ टक्के आहे, वेळेत मदत, लवकर निदान आणि विश्वसनीय माहिती यासाठी खूपच आवश्यक गोष्टी ठरतात. २०२२ मध्ये १.४१ दशलक्ष भारतीय लोकांमध्ये कॅन्सरचे निदान झाले.२ स्तनांचा कॅन्सर हा महिलांमध्ये मृत्यू येण्याचे कारण ठरणारा कॅन्सर आहे३, तर पुरुषांमध्ये मौखिक कॅन्सर चे प्रमाण सर्वाधिक आहे.४ जरी हा ताण वाढत असला तरीही कॅन्सर तपासणीचा दर हा देशभरात खूप कमी असून काही ठिकाणी याचा असमतोलही दिसून येतो.

## ८४ वर्षीय रुग्णावर जीवघेण्या विकारावर यशस्वी शस्त्रक्रिया

**पुणे (दै. संध्या) :**

मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथील हृदयविकारतज्ज्ञ आणि कार्डिओव्हॅस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जरी (CVTS) विभागाने 84 वर्षीय रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीच्या टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन या जीवघेण्या आजारावर यशस्वी बेंटॉल (Bentall) शस्त्रक्रिया करून त्याला नवजीवन दिले. रुग्णाला अशक्तपणा आणि पोटात अस्वस्थता जाणवत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सीटी अँजिओग्राफीसह विविध तपासण्यांमध्ये महाधमनीच्या चढत्या भागापासून (Ascending Aorta) ते मूत्रपिंडाखालील भागापर्यंत (Infrarenal Abdominal Aorta) पसरलेले टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन असल्याचे निदान झाले. हा आजार कोणत्याही क्षणी महाधमनी फुटण्याचा आणि अचानक



मृत्यूचा धोका निर्माण करणारा असल्याने तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला. सीव्हीटीएस शल्यचिकित्सकांनी बायोप्रोस्थेटिक एओर्टिक व्हॉल्व्ह आणि व्हॅस्क्युलर कंड्युटचा वापर करून बेंटॉल शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या शस्त्रक्रियेदरम्यान खराब झालेला महाधमनीचा मूळ भाग आणि चढता भाग बदलण्यात आला तसेच हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी धमन्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटर, रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक औषधे, रक्त व रक्तघटकांचे संक्रमण आणि सतत निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. उपचारादरम्यान रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर झटके (फोकल सिझर्स) आणि स्टेटस एपिलेप्टिकस हा न्यूरोलॉजिकल गुंतागुंतीचा त्रास झाला. न्यूरोलॉजी आणि क्रिटिकल केअर विभागाने तातडीने उपचार सुरू करून EEG, MRI, आवश्यक औषधोपचार आणि सतत निरीक्षणाच्या मदतीने ही गुंतागुंत यशस्वीरीत्या नियंत्रित केली. मेंदूच्या तपासणीत कोणतीही गंभीर इजा आढळली नाही.

कार्डिओलॉजी, सीव्हीटीएस सर्जरी, क्रिटिकल केअर, न्यूरोलॉजी, ॲनेस्थेशिया आणि फिजिओथेरपी विभागांच्या समन्वित उपचारांमुळे रुग्णाची प्रकृती हळूहळू सुधारली. त्यांना व्हेंटिलेटरवरून यशस्वीरित्या मुक्त करण्यात आले, फिजिओथेरपीच्या मदतीने चालण्यास सुरुवात झाली आणि अखेर त्यांना स्थिर प्रकृतीत घरी सोडण्यात आले.

याबाबत डॉ. सूरज कुमार पाटील, सल्लागार – इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट, म्हणाले, "टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन ही अत्यंत गंभीर शस्त्रक्रिया आणीबाणीची स्थिती आहे. वेळेवर निदान, तातडीची शस्त्रक्रिया आणि विविध तज्ज्ञ विभागांच्या समन्वित उपचारांमुळे एवढ्या उच्च जोखमीच्या वृद्ध रुग्णालाही यशस्वी उपचार देता आले." ही यशस्वी शस्त्रक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरीच्या प्रगत हृदयशस्त्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञान आणि बहुविभागीय उपचार पद्धतीतील कौशल्याची साक्ष देणारी असून, जीवघेण्या हृदयविकारांवर वेळेत उपचार केल्यास उत्कृष्ट परिणाम साध्य होऊ शकतात, हे या प्रकरणातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## वारकरी सेवेतून अवतरली विठ्ठल भक्ती!

- चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीने लाखो भाविकांचे पुण्यात अगत्यपूर्वक स्वागत
- वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील तृप्ती सदैव उर्जादायक : ॲड.रेणुका चलवादी

**पुणे (दै. संध्या) :**

'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल' अशा विठू नामाच्या जयघोषाने अवघी संतभूमी पुणे नगरी दुमदुमून गेली आहे. आषाढी वारीच्या सोहळ्यानिमित्त पुण्यात दाखल झालेल्या लाखो वारकरी भाविकांचे स्वागत करण्यासाठी अवघे शहर सज्ज झाले असतानाच, चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीने यंदाही माऊलींच्या लाडक्या वारकऱ्यांची सेवा करण्याची आपली दैदिप्यमान परंपरा मोठ्या भक्तीभावाने आणि अगत्यपूर्वक कायम ठेवण्यात आली.

विश्रांतवाडी येथील आळंदी रोडवरील एचडीएफसी बँकेसमोर, चलवादी शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष तथा भाजप-आरपीआय



युतीच्या धडाडीच्या कार्यकर्त्या ॲड. रेणुकाताई चलवादी-शिर्के यांच्या वतीने पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी मैलोन्मैल चालणाऱ्या वारकऱ्यांच्या सुविधेसाठी त्यांना उपयोगी अशा बॅग्ज, बिस्किटे आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचे वाटप करून त्यांची मनोभावे सेवा करण्यात आली. याप्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा आरपीआयचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी आणि सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिर्के, आकाश चलवादी प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच पुणे इंटरनॅशनल स्कूल येथे काही दिंडींची राहण्याची व्यवस्थाही संस्थेच्या वतीने करण्यात आली होती.

अनेक दिवसांचा पायी प्रवास करून थकलेल्या, पण विठ्ठल भेटीच्या ओढीने चेहऱ्यावर एक वेगळंच तेज असणाऱ्या या वारकरी माऊलींना पाहून आमचे मन भरून आले. त्यांच्या पायातील चपला झिजतात, पण विठ्ठलाप्रती असलेली श्रद्धा कधीच कमी होत नाही. अशा या संत कल्पवृक्षाची सेवा करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी आनंदाची आणि समाधानाची गोष्ट आहे. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील तृप्ती सदैव उर्जा देणारी असते, असे प्रतिपादन ॲड. रेणुका चलवादी यांनी व्यक्त केले.

वारी ही महाराष्ट्राची केवळ परंपरा नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा प्राण आहे. डोक्यावर तुळशीवृंदावन, हाती टाळ आणि मुखात विठ्ठल नाम घेऊन ऊन-पावसाची फिकीर न करता पंढरीची वाट धरणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे हीच आमच्यासाठी खरी ईश्वर सेवा आहे. ही पवित्र परंपरा आमच्या शिक्षण संस्थेने अनेक वर्षांपासून जपली असून, ती पुढेही अशीच निरंतर सुरू राहील, असे प्रतिपादन डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.लाखो भाविकांच्या अथांग सागरात, चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीने सर्वांनी अत्यंत आपुलकीने आणि श्रद्धेने प्रत्येकाला मदतीचा हात दिला. वारीच्या या सोहळ्यात सेवाकार्याचा हा अनोखा त्रिवेणी संगम यावेळी चर्चेचा विषय ठरला.

## श्री शिशिर बजाज 'महाराष्ट्र का गौरव' पुरस्काराने सन्मानित




**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

नवी दिल्ली येथील हयात रीजेन्सीमध्ये आयोजित भव्य समारंभात नवभारततर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, वरिष्ठ कॅबिनेट मंत्री, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि देशभरातील प्रतिष्ठित पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या विशेष आवृत्तीत बजाज समूहाचे चेअरमन एमेरिटस आणि बजाज फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शिशिर बजाज यांच्यावर आठ पानांचे विशेष लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. या लेखामध्ये स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक, उद्योगक्षेत्रातील अग्रणी आणि महात्मा गांधींचे दत्तक पाचवे पुत्र म्हणून ओळखले जाणारे संस्थापक श्री. जमनालाल बजाज यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्यात श्री. शिशिर बजाज यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्री. शिशिर बजाज यांचा भारतीय उद्योगक्षेत्रातील, विशेषतः साखर आणि इथेनॉल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल तसेच ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर केलेल्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. देशाच्या विकासात, उद्योग उभारणीत आणि समाजसेवेत 100 वर्षांपासून मोलाचे योगदान देणाऱ्या बजाज कुटुंबाला हा सन्मान एका विशेष आणि ऐतिहासिक क्षणी मिळाला आहे. राष्ट्र प्रथम, आत्मनिर्भरता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांवर उभारलेला बजाज समूहाचा वारसा काळानुसार भारताच्या गरजांनुसार सतत विकसित होत गेला आहे. श्री जमनालाल बजाज यांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान देत स्वदेशी उद्योगांची पायाभरणी केली. त्यानंतरच्या पिढ्यांनी त्यांच्या विचारांना पुढे नेत देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण संस्था उभारल्या.

## कात्रज चौकात सराईताकडून पावणेसहा कोटींचे मेफेड्रोन जप्त

**पुणे (दै. संध्या) :**

पोलिसांनी येरवड्यातील एका सराईत गुन्हेगाराकडून पाच कोटी ७९ लाख रुपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्त केले. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (ता. ९) पहाटे कात्रज चौकात ही कारवाई केली. प्रशांत सुरेश सावंत (वय ३८, रा. गणेशनगर, येरवडा; सध्या रा. आलायम बिल्डिंग, खेसेपार्क, लोहगाव रस्ता) असे अटक केलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. या प्रकरणी अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस अंमलदार अतुल क्षीरसागर यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पुणे शहर 'ड्रग्ज मुक्त' करण्यासाठी अमली पदार्थांची विक्री आणि खरेदी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

# इंडियन कॅन्सर सोसायटीला 'सी पॉझिटिव्ह अवॉर्ड : एनजीओ इम्पॅक्ट अवॉर्ड' प्रदान

**पुणे (दै. संध्या) :**

इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस ) या कर्करोग नियंत्रणासाठी कार्य करणाऱ्या देशातील पहिल्या स्वयंसेवी, ना-नफा संसंस्थेला रायझिंग इंडिया रिसर्च फाउंडेशन आणि टेक्सास स्कूल ऑफ मेंटल हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'सी पॉझिटिव्ह अवॉर्ड २०२६ – एनजीओ इम्पॅक्ट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

कर्करोगाबाबत जनजागृती, लवकर निदान, रुग्ण सहाय्य, पुनर्वसन, जनहित वकिली आणि समाजाभिमुख उपक्रमांमधील संस्थेच्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर ) मधील एपिडेमियोलॉजी व संसर्गजन्य रोग विभागाचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ, प्रख्यात महामारीतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ तसेच भारताच्या कोविड-१९ प्रतिसादादरम्यान महत्त्वाचे सल्लागार राहिलेले पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारण्याचा मान इंडियन कॅन्सर सोसायटीला मिळाला.



"इंडियन कॅन्सर सोसायटीच्या सेवेला ७५ वर्षे पूर्ण होत असताना हा पुरस्कार रुग्णकेंद्रित कार्यक्रम, प्रतिबंधात्मक उपक्रम आणि कर्करोग उपचारांपर्यंत समान व न्याय्य प्रवेश उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या कार्याचा गौरव करणारा आहे. विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्वयंसेवक, देणगीदार, भागीदार संस्था आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने आयसीएस भारतातील कर्करोगाचे वाढते ओझे कमी करण्याच्या आपल्या ध्येयासाठी सातत्याने कार्यरत आहे," असे इंडियन कॅन्सर सोसायटीच्या व्यवस्थापकीय विश्वस्त व मानद सचिव श्रीमती उषा थोरात यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, "हा सन्मान जनजागृती व प्रतिबंध, लवकर निदान, उपचारासाठी सहाय्य आणि पुनर्वसन या क्षेत्रांतील आमच्या सामूहिक प्रयत्नांचा प्रभाव अधोरेखित करतो.

कर्करोगाचा सामना कोणालाही एकट्याने करावा लागू नये, यासाठी आम्ही सरकार, विविध संस्था, स्थानिक समुदाय आणि सहकार्यकर्त्यांसोबत सातत्याने काम करण्यास कटिबद्ध आहोत."


महाराष्ट्र शासन

**बै.जी. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, पुणे**

जयप्रकाश नारायण रोड, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-४११ ००१

email : deanbjgmepune@gmail.com | दूरध्वनी क्र. ०२०२६१०२३६५ | संकेतस्थळ फॅक्स क्र. २६१२६८६८

जा.क्र. बैजीशावैम/राजप/जाहीरात/करार/६३२४/२०२६ — दि.०२/०७/२०२६

**जाहिरात**

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील ससून सर्वोपचार रुग्णालय बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील अतिविशेषोपचार व चिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन upload करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्यासाठी लिंक www.med-edu.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येईल.

सही/-
(डॉ. एकनाथ पवार)
अधिष्ठाता,
बै. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.

विमाका/पुणे/जाहिरात/७३/२०२६-२७

# महसूलवाढीबरोबरच पर्यावरणपूरक विकासकामांना स्थायी समितीची मंजुरी

## जाहिरात धोरण, रुग्णालयीन सेवा, जलनिःसारण, अग्निशमन, ई-वाहन प्रोत्साहनासह २४ महत्त्वाच्या विषयांना हिरवा कंदील

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक आज स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत महापालिकेचे उत्पन्न वाढविणे, शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे, पर्यावरणपूरक धोरणांना चालना देणे तसेच नागरिकांना अधिक गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने २७ महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच स्थायी समिती सदस्य आणि विविध विभागप्रमुख उपस्थित होते.

बैठकीत शहरातील ८० उड्डाणपूल व भुयारी मार्गांवरील जाहिरात हक्क १० वर्षांच्या कालावधीसाठी ई-लिलावाद्वारे अधिकतम दर देणाऱ्या निविदाधारकांना देण्यास मान्यता देण्यात आली. जुना मुंबई-पुणे महामार्ग, औंध-रावेत बीआरटी मार्ग तसेच मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील जाहिरात हक्क निश्चित करण्यात आले असून यामुळे महापालिकेला दीर्घकालीन महसूल प्राप्त होणार आहे. याचबरोबर शहरातील १५ हजारांहून अधिक विद्युत पोलांवर किऑस्क जाहिराती उभारण्यासाठी सहा क्षेत्रीय कार्यालयांतील निविदांना मंजुरी देण्यात आली. तसेच १८ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवरील दिशादर्शक फलकांवर जाहिरात हक्क देण्यासही मान्यता देण्यात आली. या सर्व जाहिरात माध्यमांमधून महापालिकेच्या कायमस्वरूपी उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांमधील संगणक यंत्रणांची देखभाल व दुरुस्ती अखंडित सुरू राहावी यासाठी विद्यमान एजन्सी मे. झुम कॉम्प्युटर्स यांना नवीन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ३० एमबीपीएस इंटरनेट लीज्ड लाईन तसेच मंत्रालयाशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क राखण्यासाठी ४ एमबीपीएस पॉइंट-टू-पॉइंट लाईन भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) मार्फत उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील शवागारामधील अत्याधुनिक कोल्ड स्टोरेजच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती (AMC) खर्चालाही मान्यता देण्यात आली, ज्यामुळे शवागारातील सुविधा अधिक सक्षम व सुरळीत राहणार आहेत. महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध राहावे यासाठी एकूण ३७ वाहनचालक कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. यामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, नवीन भोसरी, सांगवी, यमुनानगर, थेरगाव, तालेरा, आकुर्डी आणि जिजामाता रुग्णालयांचा समावेश आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील संभाजीनगर येथे स्टॉर्म वॉटर लाईन उभारण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली. तसेच अर्बन स्ट्रीट डिझाईन पद्धतीने विकसित करण्यात आलेल्या पदपथांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामालाही मंजुरी देण्यात आली. समाज विकास विभागामार्फत एचआयव्ही/एड्स बाधित पात्र लाभार्थ्यांना पीएमपीएमएलचे मोफत बस पास उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला. या योजनेंतर्गत नव्या व नूतनीकरण केलेल्या शेकडो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. महापालिकेच्या उर्दू माध्यम बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षणांतर्गत लेखन साहित्य खरेदीस मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक १८ चिंचवड परिसरातील मिसिंग लिंक व इतर रस्ते विकसित करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. नेक्सस टेक्नो कन्सल्टंट्स यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. पर्यावरण अभियांत्रिकी विभागांतर्गत चऱ्होली येथील टप्पा-१ व टप्पा-२ मैलाशुद्धीकरण केंद्राच्या तीन वर्षांच्या संचालन, देखभाल व दुरुस्तीच्या कामास मंजुरी देण्यात आली. तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमधून प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराला चालना देण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार जलनिःसारण जोडणी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.


महापालिकेच्या नवीन ‘ज’ (लोहगड) आणि ‘ल’ (रायगड) क्षेत्रीय कार्यालयांसाठी आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. जलनिःसारण विभागांतर्गत प्रभाग क्रमांक ११ व १२ मधील जलनिःसारण नलिका, चेंबर्सची देखभाल-दुरुस्ती तसेच ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तांत्रिक सेवा प्रदात्यांनी सुचविलेल्या जलनिःसारण विषयक कामांना मंजुरी देण्यात आली. या कामांमुळे पावसाळ्यातील पाणी तुंबण्याच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना होण्यास मदत होणार आहे. अग्निशमन विभागासाठी अत्यावश्यक सेवांमध्ये वापरले जाणारे अत्याधुनिक स्मार्ट गार्ड कटर उपकरण खरेदीस मंजुरी देण्यात आली. या उपकरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य अधिक वेगाने आणि परिणामकारकपणे करता येणार आहे.

बीआरटी कॉरिडॉर क्रमांक ३ वरील रेलिंग दुरुस्ती तसेच बसस्टॉपच्या वार्षिक देखभाल-दुरुस्तीच्या कामांना मंजुरी देण्यात आली. शहरातील स्वच्छ व पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी पारंपरिक इंधनावरील रिक्षांचे ई-रिक्षामध्ये रूपांतर (रेट्रोफिटिंग) करणाऱ्या वाहनधारकांनाही प्रति रिक्षा ₹३० हजारांचे अनुदान देण्याची शिफारस महापालिका सभेकडे करण्याचा निर्णय घेण्यात आला. दापोडी येथील नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र तलाठी कार्यालय सुरू करण्यासाठी महापालिकेच्या गाळ्याची जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

याशिवाय, विविध विभागांतील निविदा, पायाभूत सुविधा विकास, आरोग्य सेवा, जलनिःसारण व्यवस्था, पर्यावरण संवर्धन, कार्यालयीन सुविधा, सामाजिक कल्याणकारी योजना आणि महापालिकेच्या महसूलवाढीस चालना देणाऱ्या विविध विषयांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली.

> “महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात सातत्याने वाढ व्हावी आणि त्याचबरोबर नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दुहेरी उद्देशाने आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, पर्यावरण संरक्षण, डिजिटल प्रशासन, अग्निसुरक्षा आणि सार्वजनिक सुविधा अधिक सक्षम करण्यावर स्थायी समितीचा भर राहणार आहे. विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेत अंमलबजावणी यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. नागरिकांच्या अपेक्षांनुसार शहराचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.”
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पूरग्रस्त भागांमध्ये आरोग्य व स्वच्छता उपाययोजना तातडीने राबवा

■ माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

पिंपरी (दैनिक संध्या) : अलीकडील मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीनंतर नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देत पूरग्रस्त भागांमध्ये तातडीने आरोग्यविषयक सुविधा व स्वच्छता उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. नाना काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक भागांत घरांमध्ये पाणी शिरल्याने चिखल, कचरा आणि साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया तसेच इतर साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. पूर ओसरल्यानंतर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खराब झालेले साहित्य व कचरा बाहेर काढला असला तरी कचरा वाहून नेण्यासाठी उपलब्ध यंत्रणा अपुरी पडत असल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. नाना काटे यांनी महानगरपालिकेकडे पूरग्रस्त भागांमध्ये अतिरिक्त कचरा गाड्यांची व्यवस्था करून त्वरित कचरा उचलणे, जंतुनाशक औषधांची फवारणी करणे, ब्लीचिंग पावडरचा वापर करणे, जेट स्प्रे मशीनद्वारे रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करणे, डास प्रतिबंधक फॉगिंग मोहीम राबविणे तसेच आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय पथके तैनात करून नागरिकांना तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. पूरग्रस्त नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असून महानगरपालिकेने युद्धपातळीवर उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नाना काटे यांनी व्यक्त केली आहे.

### मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा : सुलभा उबाळे



पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो येथे कचऱ्याचा ढिग इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मोशी कचरा डेपोमध्ये साचलेल्या कचऱ्याच्या मोठ्या ढिगाऱ्यामुळे शेजारील इमारत कोसळून गंभीर दुर्घटना घडली. या घटनेला महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे प्रमुख संजय कुलकर्णी यांच्यासह संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद असल्याने कचऱ्याचे ढिग वाढत गेले आहेत. बायोमायनिंगच्या विविध टप्प्यांसाठी शेकडो कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या, मात्र प्रत्यक्षात कचऱ्याचे डोंगर कमी होण्याऐवजी वाढतच गेल्याचा आरोपही त्यांनी केला. पर्यावरण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करत या विभागाची स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्याची मागणी सुलभा उबाळे यांनी केली आहे. मोशी कचरा डेपोमध्ये राबविण्यात आलेल्या अनेक प्रकल्पांवर हजारो कोटी रुपये खर्च झाले असून त्यापैकी अनेक प्रकल्प बंद पडल्याचा दावा करत, सार्वजनिक निधीच्या वापराची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही सुलभा उबाळे यांनी पत्राद्वारे केली आहे. मोशी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर या मागणीमुळे महापालिकेच्या कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण विभागाच्या कारभाराबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आळंदीहून पुण्याकडे प्रस्थान

आळंदी (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आळंदी येथून पुण्याकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. “ज्ञानोबा-तुकाराम”च्या अखंड जयघोषात हजारो वारकरी, दिंड्या, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या वातावरणात माऊलींची पालखी पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाली. मुसळधार पावसाची शक्यता आणि इंद्रायणी नदीच्या वाढलेल्या पाणीपातळीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि विविध विभागांनी पालखी सोहळ्यासाठी विशेष नियोजन केले आहे.

## ‘लेक लाडकी’ राज्यस्तरीय कवी संमेलनात लेकीच्या कर्तृत्वाचा काव्यमय जागर

चिंचवड (दै. संध्या)

कर्मयोगिनी महिला संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'लेक लाडकी' राज्यस्तरीय कवी संमेलन उत्साहपूर्ण आणि भावनाप्रधान वातावरणात संपन्न झाले. चिंचवड येथील सुखी भवन सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात लेकीचे अस्तित्व, तिचे कर्तृत्व, संघर्ष, माया आणि यश यांचे प्रभावी चित्रण करणाऱ्या कवितांनी रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रा. चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. तुकाराम पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र घावटे, सौ. सविता इंगळे आणि सुरेश कंक उपस्थित होते. यावेळी सुप्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. रोहिता गांधी यांनी 'आहार व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन करत संतुलित जीवनशैलीचे महत्त्व विशद केले. उद्घाटक प्रा. चंद्रकांत दादा वानखेडे यांनी आपल्या पहाडी आवाजात आणि प्रभावी शैलीत,"लेक माऊली बापाची, लेक साऊली बापाची, लेक माहेराचा थाट, लेक संसाराचा पाट..."या ओळी सादर करत आई- वडील आणि लेकीतील अतूट नात्याचे हृदयस्पर्शी वर्णन केले. अध्यक्ष प्रा. तुकाराम पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून लेकीच्या कर्तृत्वाचा गौरव करत तिच्या सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला.

## जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत

पिंपरी (दै. संध्या)



मुखी हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आज पिंपरी-चिंचवड शहरात दाखल झाला. देहूनगरीतून पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झालेल्या या भक्तिमय सोहळ्याचे पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पक्षाच्या वतीने निगडी येथील भक्ती-शक्ती चौकात भव्य स्वागत करण्यात आले. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पालखी सोहळा शहरात दाखल होताच भक्ती-शक्ती चौक परिसर वारकरी, भाविक आणि नागरिकांनी फुलून गेला. पालखीच्या स्वागतासाठी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली विशेष स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. यावेळी आमदार शंकर जगताप, भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी सोहळ्यात सर्वात पुढे सनई-चौघड्यांचा गजर, त्यामागे तुकोबारायांच्या पालखीचे अश्व आणि फुलांनी सजविलेल्या चांदीच्या रथातील पादुकांची पालखी असा पारंपरिक व भक्तिमय लवाजमा पाहायला मिळाला. हा अलौकिक सोहळा अनुभवण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भारतीय जनता पक्षाच्या वतीने यावेळी वारकऱ्यांना फळे तसेच बुंदीच्या पुड्यांचे वाटप करण्यात आले. वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

निगडीतील भक्ती-शक्ती चौकातून पुढे दत्तवाडी, विठ्ठलवाडी मार्गे पालखी आकुर्डी गावठाणात पोहोचली. आजचा मुक्काम आकुर्डी येथील दत्तवाडीतील विठ्ठल मंदिरात असणार असून, उद्या सकाळी पालखी पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. विठ्ठलनामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेला हा सोहळा पिंपरी-चिंचवडकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

## शनिवारी महात्मा फुले विद्यालयात शिष्यवृत्ती उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव - वसंत लोंढे

पिंपरी (दै. संध्या)



**क्षितिजय नप्ते याचा राज्यात प्रथम क्रमांक**

भोसरी येथील महात्मा फुले जागृती मंडळाच्या महात्मा फुले विद्यालयातील क्षितिजय नप्ते याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच विद्यालयाच्या पाचवी इयत्तेतील ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आणि २० विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत तसेच आठवी इयत्तेतील २ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले आहेत. या विद्यार्थ्यांना शिक्षिका मंगल आहेर - गावडे यांनी मार्गदर्शन केले या सर्वांचा गुणगौरव सोहळा शनिवारी, (दि. ११) सकाळी ११ वाजता शाळेच्या पटांगणावर आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष वसंत (नाना) लोंढे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

यावेळी आमदार महेश लांडगे, महापौर रवी लांडगे, स्थानिक नगरसेवक तसेच पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षण अधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी संगीता बांगर, महात्मा फुले विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुलभा चव्हाण माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक मोहन वाघुले आदी उपस्थित राहणार आहेत.

संस्थेचे उपाध्यक्ष श्याम लोंढे, अनिल लोंढे, सोमनाथ रासकर, सचिव संतोष लोंढे, उपसचिव संदीप लोंढे, खजिनदार वृषभ रासकर, सह खजिनदार दीपक लोंढे, महेश लोंढे, हिशोब तपासणीस विजय लोंढे, सह हिशोब तपासणीस अतुल रासकर, सभासद तुषार लोंढे, संकेत लोंढे, सिद्धेश लोंढे, अमित लोंढे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला आहे.

इयत्ता पाचवी मधील क्षितिजय प्रवीण नप्ते याने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २९० गुण प्राप्त करत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. वेदांत राजेंद्र गोरडे याने राज्यात चौथा, तर तनिष्का चांगदेव केदार हिने राज्यात १३ वा क्रमांक मिळवत विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष वसंत लोंढे यांनी दिली.

महात्मा फुले विद्यालयाची शिष्यवृत्ती परीक्षेतील ही सलग २६ व्या वर्षीची उल्लेखनीय कामगिरी असून, गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ दरवर्षी २० पेक्षा अधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत. या सातत्यपूर्ण यशामागे विद्यालयातील आदर्श शिक्षिका मंगल आहेर गावडे यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. त्या गेल्या २७ वर्षांपासून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन करत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४०० हून अधिक विद्यार्थी जिल्हा व राज्य गुणवत्ता यादीत झळकले आहेत. त्यामुळे महात्मा फुले विद्यालयाने राज्यभर 'शिष्यवृत्ती शाळा' म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

## भाविकांना अखंड आरोग्यसेवा देण्यासाठी वैद्यकीय विभाग सज्ज

पिंपरी (दै. संध्या)

■ प्रमुख पालखी मार्गांवर ७ वैद्यकीय पथके, ७३ अधिकारी-कर्मचारी, २४ तास रुग्णवाहिका व आरोग्यसेवेची व्यापक व्यवस्था

आषाढी पालखी सोहळा २०२६ निमित्त लाखो वारकरी पिंपरी-चिंचवड शहरातून मार्गक्रमण करणार असून त्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने व्यापक नियोजन केले आहे. वारकऱ्यांना तातडीची आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी सात वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, प्रथमोपचार किट, कार्डियाक रुग्णवाहिका तसेच स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यावर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत एकूण ७ वैद्यकीय पथके कार्यरत राहणार असून त्यामध्ये ७३ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या पथकांमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, फार्मासिस्ट, एम.पी.डब्ल्यू., वॉर्ड बॉय, रुग्णवाहिका चालक तसेच आशा स्वयंसेविका यांचा समावेश आहे. तसेच पालखी सोहळ्याचे कामकाज सुरळीत व समन्वयाने पार पाडण्यासाठी प्रत्येक रुग्णालय स्तरावर झोनल अधिकारी आणि नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या मूलभूत सुविधांचाही विचार करून पालखी मार्गावर १,९२५ शौचालये आणि ६२५ स्नानगृहे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच दिंडी प्रमुखांना आवश्यक उपचार तातडीने करता यावेत यासाठी १,५०० प्रथमोपचार किटचे वितरण करण्यात येणार आहे. दि. ८ जुलै २०२६ रोजी निगडी येथील भक्ती-शक्ती समूहशिल्प येथे रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे.

# साक्षरतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा अभिनव उपक्रम – महापौर

## जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात शिक्षण विभागाचा साक्षरता जनजागृती चित्ररथ होणार सहभागी

पिंपरी (दै. संध्या)



केंद्र शासनाच्या उल्लास–नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात यंदा प्रथमच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा ‘साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश’ हा जनजागृतीपर चित्ररथ सहभागी होत आहे. हा चित्ररथ आकुर्डी ते पंढरपूर या पालखी मार्गावर वारकऱ्यांमध्ये शिक्षणाचा संदेश पोहोचविणार असून, शिक्षण विभागाचे १० कर्मचारी संपूर्ण पालखी सोहळ्यात सहभागी होऊन साक्षरता अभियान राबविणार आहेत.

या चित्ररथाचे उद्घाटन महापौर रवि लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते वसंतदादा पाटील विद्यामंदिर येथे संपन्न झाले. यावेळी महापालिकेचे उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाचे कृष्णकुमार पाटील, उपसंचालक वंदना वावळ, गणपत मोरे, सहाय्यक संचालक सतीश चौधरी, शिक्षण उपनिरीक्षक रमेश चव्हाण तसेच शिक्षण विभागाचे सर्व पर्यवेक्षक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या माध्यमातून साक्षरतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा अभिनव उपक्रम आहे. ‘साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश’ या चित्ररथाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व आणि निरक्षरता निर्मूलनाचा संदेश वारकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेण्याची संधी मिळावी, आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.

**‘साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश’ उपक्रमाचा उद्देश**

‘साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश’ या उपक्रमाचा मुख्य उद्देश निरक्षर आणि अल्पशिक्षित नागरिकांची नोंदणी करून त्यांना साक्षरतेसाठी प्रोत्साहित करणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे तसेच महाराष्ट्र शासन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा आहे. पालखी मार्गावरील वारकरी, नागरिक आणि भाविकांशी संवाद साधून साक्षरता अभियानाचा व्यापक प्रसार केला जाणार आहे.



## ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या अत्याधुनिक साठवणूक केंद्राचे उद्घाटन

**नारायणगाव (दै. संध्या)**


आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह आणि केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवण योजना' व कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेंतर्गत बेल्हे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीमध्ये उभारण्यात आलेल्या 500 मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.

यावेळी नाबार्ड पुणे विभागाचे सरव्यवस्थापक अविनाश सेळेकर, व्यवस्थापक प्रणित राज, संस्था सक्षमीकरण समन्वयक रमेश बांडे, जुन्नर चे सहायक निबंधक (सहकारी संस्था) डॉ. गजेंद्र देशमुख, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपसरव्यवस्थापक गिरीश जाधव, सहकार आयुक्त दीपक तावरे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक ॲड.संजयराव काळे, विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष अशोक गुंजाळ, उपाध्यक्ष कैलास औटी, जिल्हा परिषद सदस्या स्मिता कणसे, भाऊसाहेब भांबेरे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पिंगट, सुमित बोरचटे, पांडुरंग गाडगे, विश्वनाथ डावखर, बाळासाहेब खिलारी, जयवंत घोडके यांच्यासह पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेल्हे येथे उभारण्यात आलेल्या या आधुनिक धान्य गोदामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सुरक्षित आणि वैज्ञानिक पद्धतीने धान्य साठवणुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कृषी उत्पादनाचे मूल्यवर्धन, दर्जेदार साठवण, प्रभावी विपणन आणि सहकारी संस्थेच्या व्यवसायवृद्धीला चालना मिळणार असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होणार आहे.

या आधुनिक धान्य गोदामामध्ये वैज्ञानिक पद्धतीने धान्य साठवण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे धान्याचे पावसामुळे, आर्द्रतेमुळे किंवा किडीमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होईल. तसेच शेतमालाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यास आणि काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्यास या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल. स्थानिक शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनी या प्रकल्पाचे स्वागत करत, यामुळे कृषी उत्पादनाचे योग्य व्यवस्थापन, वाहतूक खर्चात बचत आणि शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशासनानेही भविष्यात अशा सुविधा राज्यातील इतर भागांत उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे सांगितले.

> यावेळी केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या विविध राष्ट्रीय उपक्रमांचेही दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. त्यामध्ये देशभरातील 232 धान्य गोदामांचे भूमिपूजन, उद्घाटन व लोकार्पण, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि भारतीय बीज सहकारी समिती यांच्यातील केळी टिश्यू कल्चर प्रयोगशाळेसंदर्भातील सामंजस्य करार, राष्ट्रीय सहकारी डेटाबेस (छउऊ) पोर्टल 3.0, एनडीडीबी दुग्ध सहकारी समीक्षा डॅशबोर्ड, तसेच विविध राष्ट्रीय बहुराज्य सहकारी संस्थांच्या पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले.

# गराडे धरण शंभर टक्के भरले; सांडव्यातून कऱ्हा नदीत विसर्ग सुरु



**नीरा (दै. संध्या)**

- सासवडसह पाच गावांच्या पाणीपुरवठ्याला दिलासा
- नाझरे धरणातही पाण्याची आवक होण्याची शक्यता

पुरंदर तालुक्यातील सासवड शहरासह पाच गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत असलेले गराडे धरण बुधवारी शंभर टक्के भरले. धरणाची एकूण साठवण क्षमता ६५ एमसीएफटी असून धरण भरल्यानंतर सांडव्यातून पाणी कऱ्हा नदीपात्रात वाहू लागले आहे. त्यामुळे पुरंदरच्या पश्चिम भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या चार ते पाच दिवसांपासून पुरंदर किल्ला परिसरासह तालुक्याच्या पश्चिम भागात संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे गराडे धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आणि बुधवारी धरण पूर्ण क्षमतेने भरले. धरणातून सांडव्याद्वारे पाणी कऱ्हा नदीत सोडले जात असल्याने नदीला पुन्हा प्रवाह प्राप्त झाला आहे.

कऱ्हा नदीतील हे पाणी पुढे नाझरे धरणात पोहोचणार असल्याने पुरंदर व बारामती तालुक्यातील ७२ वाड्या-वस्त्या आणि गावांच्या पाणीप्रश्नावर मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मागील दोन महिन्यांपासून नाझरे धरण जवळपास कोरडे पडले होते. आता कऱ्हा नदीमार्गे पाण्याची आवक सुरू झाल्यास या भागातील पाणीटंचाई दूर होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, गराडे धरण शंभर टक्के भरल्यानंतर भाजपचे जिल्हा सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाराम जगदाळे तसेच भाजप सासवड शहराध्यक्ष आनंद जगताप यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे पूजन करण्यात आले. यावेळी भाजपचे युवा नेते जालिंदर जगताप, शिवाजी बापू जगदाळे, सुनील तात्या जगदाळे, संदीप कदम, दत्तात्रय जगदाळे, बाळासाहेब यादव, भानुदास रावडे, सुभाष जगदाळे, प्रभाकर जगदाळे, संजय रावडे, शांताराम रावडे, संदीप जगदाळे, लक्ष्मण जगदाळे, श्रेयश शेवाळे, अमोल जगदाळे, ओंकार जगदाळे, सोमनाथ जगदाळे, सुजल जगदाळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जुन्नर तालुक्यात अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांचा छापा

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरोली बुद्रुक व तेजेवाडी येथे बेकायदेशीरपणे देशी आणि विदेशी दारूची विक्री करणाऱ्या दोन वेगवेगळ्या ठिकाणांवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे.या छाप्यात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात मद्यसाठा जप्त केला असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शिरोली बुद्रुक येथील गुजरबाई किसन गुंजाळ ही महिला आपल्या राहत्या घराच्या आडोशाला विनापरवाना बेकायदेशीररीत्या दारूची विक्री करत असल्याचे पोलिसांना आढळून आले. तर दुसऱ्या कारवाईत, तेजेवाडी येथील तुषार गणपत बोऱ्हाडे हा तरुण एका चायनीज दुकानाच्या पाठीमागे देशी-विदेशी दारूच्या बाटल्यांची गुपचूप विक्री करत असताना रंगेहात पकडला गेला. पोलीस अमलदार समाधान ताडगे आणि विनोद पवार यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. पोलिसांनी दोन्ही ठिकाणांवरून सर्व बेकायदेशीर मद्यसाठा जप्त केला असून, आरोपी गुजरबाई गुंजाळ आणि तुषार बोऱ्हाडे या दोघांविरोधात जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## गावडेवाडी येथून आजा मेळा दिंडी क्रमांक २६चे प्रस्थान

**नारायणगाव (दै. संध्या)**



पंढरीची वारी ही महाराष्ट्राची 800 वर्षापासून ही जुनी संस्कृती आहे . ही संस्कृती आणि परंपरा आजही जपली जात आहे. या वारीत पायी लाखो वारकरी विठ्ठलाचा नामजप करत पायी चालत पंढरपूरला जातात. "ही केवळ एक यात्रा नसून मानवी समानता, समभाव, त्याग आणि भक्तीचा उत्तम मिलाप म्हणजे पंढरपूरची आणि आळंदीची पायी वारी".

स्वर्गीय ह .भ .प. निवृत्ती महाराज गायकवाड यांच्या कर्तृत्वातून आजा मेळा दिंडी क्रमांक 26 ही गेल्या अनेक वर्षाची परंपरा असून ,ही दिंडी त्यांनी सुरू केली. ती परंपरा त्यांनी आणि त्यांच्यानंतर त्यांच्या मुलांनी आणि समाज बांधवांनी जपलेली आहे .

स्वर्गीय ह .भ .प . निवृत्ती महाराज यांच्या नेतृत्वातूनच पंढरपूर आणि आळंदी या ठिकाणी समस्त मातंग समाज धर्मशाळेचे कार्य समर्पित करण्यात आले आहे.

आजही "महाराष्ट्रातील मातंग समाजाला एकत्र येण्याचे आणि बसण्याची जागा ही धर्मशाळा पंढरपूर आणि आळंदी हे भक्तीचे श्रद्धेचे ,समतेचे, समभावाचे अधिष्ठान आहे. ह. भ .प .निवृत्ती महाराज गायकवाड यांनी महाराष्ट्रातील मातंग समाज पायी वारी दिंडीत "यारे यारे अवघे जन" या वचनाप्रमाणे समाविष्ट केला. आंबेगाव येथील ग्रामस्थ ,शेतकरी, वारकरी अतिशय त्यागी आणि समतेच्या भावनेने या दिंडीत सहभागी झाले आणि पायी वारीचे नेतृत्व, सहकार्य केले .

माझ्या मेळा दिंडी क्रमांक 26 पायी वारीची परंपरा निवृत्ती महाराज गायकवाड यांचे मोठे चिरंजीव प्राचार्य. डॉ .पांडुरंग गायकवाड तसेच ह .भ .प .मधुकर गायकवाड आणि त्यांच्या भगिनी व समाजबांधव यांनी ही परंपरा चालू ठेवली आहे. पायी वारीमुळे शारीरिक तप घडते आणि विठ्ठलाच्या नामाच्या गजराने असीम शांतता व सकारात्मक ऊर्जा मिळते.

### थोडक्यात पण महत्वाचे...

## तळेगाव ढमढेरे येथील वेळ नदीवरील पूल खचल्याने वाहतूक बंद

तळेगाव ढमढेरे (दैनिक संध्या) : तळेगाव ढमढेरे (ता.शिरूर) येथील वेळ नदीवरील पूल पुराच्या पाण्याने खचला असून, पुलावरील भरावा वाहून गेला आहे. पुलावरील रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने अहिल्यानगर- पुणे महामार्गाने कासारी फाटा मार्गे पीएमआरडीए च्या बाह्यवळण रस्त्याने तळेगाव ढमढेरे येथून पुण्याकडे होणारी वाहतूक दोन दिवसांपासून बंद आहे. वेळ नदीवरील धोकादायक पूल नवीन बांधण्याची मागणी प्रवासी, वाहन चालक व ग्रामस्थ करीत आहेत. दरम्यान, ८ वर्षांपूर्वी पीएमआरडीएने कासारी फाटा ते तळेगाव ढमढेरे हा बाह्यवळण रस्ता तयार केला, परंतु तळेगाव ढमढेरे येथील वेळ नदीवरील पुलाचे काम अद्याप रखडलेले आहे. येथील पुलाचे काम होण्यासाठी माजी आमदार स्वर्गीय बाबुराव पाचर्णे यांनी प्रयत्न केले. त्यानंतर खासदार डॉ. अमोल कोल्हे व तत्कालीन आमदार ॲड.अशोक पवार यांनी येथील पूल होण्यासाठी पीएमआरडीए प्रशासनाकडे गेली पाच वर्ष पाठपुरावा केला.

## आरटीओ कार्यालयात स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र कार्यान्वित

**नारायणगाव (दै. संध्या)**

एक एप्रिल २०२५ पासून महाराष्ट्रात परिवहन संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र एटीएस सेंटर मार्फतच जारी करण्यात येईल. असा आदेश केंद्रीय परिवहन मंत्रालयाने जारी केला होता. पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात एक वर्षापासून एटीएस चाचणी केंद्र चालू करण्याचा निर्णय अनेक वेळा तळ्यात मळ्यात चालला होता. राज्य आणि केंद्र शासन यांचा समन्वय नसल्यामुळे सदर कार्यालय चालू होण्यास विलंब होत होता. एप्रिल महिन्यात तर या केंद्रासाठी संपूर्ण मॅन्युअली पासिंग बंद ठेवले होते. त्यावेळी वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. त्यानंतर परत एकदा पासिंगला मुदतवाढ देण्यात आली होती. महाराष्ट्र मध्ये सर्वात पहिले प्रायोगिक तत्त्वावर एटीएस सेंटर नाशिक या ठिकाणी २०२२ साली चालू करण्यात आले होते. अद्याप पर्यंत राज्यात ५३ ठिकाणी शासकीय मालकीची एटीएस सेंटर चालू करण्याकरता कार्यादेश प्रदान करण्यात आलेले आहेत. तर १३ ठिकाणी खाजगी व्यावसायिकांना एटीएस. सेंटर चालू करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. राज्यात वाहनांची संख्या लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर एटीएस सेंटर चालू करण्याचा परिवहन मंत्री नितीन गडकरी यांचा मानस आहे. मात्र हा निर्णय वाहन निरीक्षकांच्या अधिकारावर गदा असल्याचे निदर्शनात आल्यानंतर, याला अंतर्गत मोठ्या प्रमाणात विरोध झाला होता. त्यामुळेच अनेक ठिकाणी जागा उपलब्ध करून सुद्धा सदर सेंटर चालू करण्यास अधिकाऱ्यांनी चालढकल केली. त्यानंतर अखेर दोन जुलैपासून मॅन्युअली पासिंगच्या पावत्या बंद होऊन एटीएस सेंटरच्या अपॉइंटमेंट चालू झाल्या. भारतातील अनेक राज्यांमध्ये खाजगी तत्वावर उभारण्यात आलेल्या एटीएस सेंटरची संख्या मोठी आहे. विशेष म्हणजे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय अतिशय जलद वाहनांची तपासणी याद्वारे होत आहे.

कार्यालयांतर्गत मावळ, मुळशी, पिंपरी, चिंचवड, जुन्नर, आंबेगाव खेड या तालुक्यातील वाहन विषयक कामकाज होत असते.

- जुन्नर आंबेगाव खेड या तालुक्यात सर्वाधिक मालवाहतूक वाहनांची संख्या आहे.
- पिंपरी चिंचवड कार्यालयात यापूर्वी दररोज

एकूण सात मोटार वाहन निरीक्षकांच्या माध्यमातून दोनशे पन्नास वाहनांची तपासणी होते.

११००० हजार स्क्वेअर फुट जागेसह २ हजार स्क्वेअर फुटाचे प्रशस्त कार्यालयाची जागा व त्यावर ३३ मीटरचे एकूण चार टेस्टिंग ट्रॅक असून त्यावरील दोन ट्रॅक मालवाहतूक व प्रवासी वाहनांसाठी राखीव आहेत.

> "ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अपघातांच्या संख्येवर आळा बसणार आहे. मानवी हस्तक्षेप न होता. वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र अतिशय जलद वेळेत मिळणार असून परराज्यात मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना या सेंटरचा सर्वात जास्त फायदा होणार आहे.
>
> **- बबन मिसाळ, पिंपरी चिंचवड ड्रायव्हिंग स्कूल असोशियन समन्वयक**

**वाहनधारकांचा फायदा**

- वाहनांचे तपासणी प्रक्रिया वेगवान
- पंधरा मिनिटात स्वयंचलित यंत्राद्वारे तपासणी
- वाहन तपासणीस पास झाल्याबरोबर. ऑनलाइन फिटनेस दिसणार.
- सदर तपासणीस, वाहनाचे टायर, लाईट, ब्रेक, स्पीडोमीटर, काच, वायफर, स्पीड गव्हर्नर या सर्वांची काटेकोर तपासणी.
- यामुळे अपघात कमी होण्यास फायदा

> "सद्यस्थितीत केंद्राचे कामकाज सुरळीतपणे चालू राहण्याकरता व केंद्रामधील कामकाजाचे अवलोकन करण्याकरिता पूर्वनियोजित वेळ आरक्षित करण्याकरिता वाहनांची संख्या कमी ठेवण्यात आली असून, येत्या काही दिवसात ते पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहण्याकरता वाहनांचे संख्येत वाढ करण्यात येणार आहे"
>
> **- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवड**

# तुळजापूर मंदिर प्रशासनाचा खुलासा म्हणजे 'चोराच्या उलट्या बोंबा'!

**धाराशिव (दै. संध्या)**

- जमीन घोटाळ्याचे पुरावे शासनाकडेच उपलब्ध, मग मंदिर प्रशासन कोणाला पाठीशी घालत आहे ? - मंदिर महासंघ




महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत अहवालानुसार, निजाम शासनाने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानाला १६६८.१४ हेक्टर (म्हणजेच ४,१२२.०७ एकर) जमीन दिलेली असताना, त्याचा पत्ता तुळजापूर मंदिर संस्थानाला नसणे, हा प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा उत्तम नमुना आहे. मंदिर प्रशासन स्वतःकडे केवळ ४०० एकर जमीन असल्याचा दावा करून प्रत्यक्षात स्वतःच्याच अकार्यक्षमतेवर पांघरूण घालत आहे. मंदिर प्रशासन ४०० एकरचा आकडा पुढे करून नेमके कोणाला पाठीशी घालत आहे? असा सवाल करत, मंदिराची भूमी परत मिळवण्यासाठी आणि कोट्यवधी भक्तांच्या श्रद्धेच्या रक्षणासाठी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू, असा निर्धार महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कायदेविषयक सल्लागार तथा तुळजापूर मंदिर घोटाळ्याबाबत कायदेशीर लढा देणारे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

धाराशिव येथे झालेल्या पत्रकार परिषदेला मंदिर महासंघाचे सोलापूर-धाराशिव जिल्हा संघटक श्री. विनोद रसाळ, हिंदु जनजागृती समितीचे श्री. अरविंद पानसरे, राष्ट्रभक्त अधिवक्ता समितीचे जिल्हा संयोजक अधिवक्ता सतिश गाजुल आणि सनातन संस्थेचे श्री. हिरालाल तिवारी उपस्थित होते.

अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी पुढे म्हणाले की, आम्ही हिंदु जनजागृती समितीच्या वतीने जेव्हा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात (जनहित याचिका क्र. २१/२०१८) याचिका दाखल केली होती, तेव्हा आम्ही महसूल व वन विभाग, गृह विभाग, विधी व न्याय विभाग, जिल्हाधिकारी व श्री तुळजापूर देवस्थान ट्रस्ट या पाच जणांना पक्षकार केले होते. त्याच वेळेला धाराशिवचे जिल्हाधिकारी यांनी तुळजापूर जमीन घोटाळ्याचा मोठा अहवाल सादर केला होता. त्यात विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव एम. एन. गिलानी (नंतर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती) यांचे १६६८.१४ हेक्टर जमीन घोटाळ्याचे पत्र सोबत जोडलेले आहे. तेव्हा त्याला पक्षकार असलेल्या तुळजापूर मंदिर प्रशासनाने हरकत घेऊन न्यायालयात प्रतिज्ञापत्र का सादर केले नाही?

मंदिराच्या जमिनीमध्ये घोटाळे झाले आहेत, हे केवळ मंदिर महासंघ सांगत नसून स्वतः राज्य शासनाने हे कागदपत्रांमध्ये मान्य केले आहे. त्याखाली विधी व न्याय खात्याचे प्रधान सचिव व मंत्री यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. न्यायालयात प्रतिवादी असलेल्या मंदिर प्रशासनाला याची माहिती कशी नाही? एकूणच मंदिर प्रशासन कोणत्या पद्धतीने आणि किती गांभीर्याने मंदिराचा कारभार करत आहे, हेच यातून स्पष्ट होत आहे. याचा जनतेने मंदिर प्रशासनाला जाब विचारला पाहिजे.

**श्री तुळजापूर मंदिराच्या ४,१२२.०७ एकर जमीनीच्या घोटाळ्याचे विवरण !**

१. तुळजाभवानी ट्रस्टच्या नावे १३७४.८७ हेक्टर (सुमारे ३,३९७ एकर) जमीनीचा मालकी हक्क असूनही, तिचा प्रत्यक्ष ताबा चार मठांमधील खाजगी व्यक्तींकडे आहे आणि याचे कोणतेही कायदेशीर स्पष्टीकरण प्रशासनाकडे नाही, असे प्रशासन म्हणते. प्रत्यक्षात, चार मठांना मंदिराची विविध प्रकारची सेवा करण्यासाठी या जमिनी 'सनद' म्हणून त्याकाळी देण्यात आल्या होत्या. मात्र, आज त्या मठांकडील जमिनींवरही मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे.
२. जगदंबा ट्रस्टच्या नावे असलेली १६३.१२ हेक्टर (सुमारे ४०३ एकर) जमीन तत्कालीन उपजिल्हाधिकाऱ्यांनी मंदिर ट्रस्टला अंधारात ठेवून बेकायदेशीररीत्या खाजगी व्यक्तींच्या नावे केली.
३. देवस्थानच्या जमिनीला 'कुळ कायदा' लागू होत नाही, असे असतानाही २५.५१ हेक्टर जमिनीपैकी ३.०४ एकर जमीन 'संरक्षित कुळ' ठरवून खरेदीखताद्वारे (दि. २१.०७.१९८१) विकण्यात आली.
४. एका अव्वल कारकुनाने अधिकाराबाहेर जाऊन तब्बल १०५.६४ हेक्टर (सुमारे २६१ एकर) जमीन ७३ व्यक्तींच्या नावे बेकायदेशीररीत्या नोंदवली.
५. अपसिंगा (ता. तुळजापूर) येथील गट क्रमांक ३५७/३ व ३५७/४ ही जमीन १५ ऑक्टोबर १९७५ व १९७९ च्या बेकायदेशीर फेरफार नोंदी दाखवून हस्तांतरित करण्यात आली. उफळा (जि. धाराशिव) येथील गट क्रमांक १०७ मधील तब्बल ६४ हेक्टर (अर्थात् १५८ एकर) जमीन बेकायदेशीररीत्या लाटण्यात आली.

ही सर्व माहिती राज्य शासन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत कागदपत्रांत उपलब्ध असूनही मंदिर प्रशासनाला सामान्य जनतेने हे लक्षात आणून द्यावे लागत असेल, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते असेल?

प्रशासनाचा पोरखेळ आणि कोट्यवधी भाविकांचा विश्वासघात : यात आणखी कहर म्हणजे, जमिनीचे घोटाळे करणाऱ्या संबंधित अव्वल कारकून व अन्य कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई म्हणून त्यांना कामावरून कमी करण्यात आले होते; मात्र काही काळानंतर पुन्हा त्यांना शासकीय सेवेत घेण्यात आले. असा प्रशासनाचा कारभार असेल, तर हडपलेली हजारो एकर जमीन मंदिराला कशी काय परत मिळेल? एक अव्वल कारकून स्वतःच्या अधिकारात मंदिराची २६१ एकर जमीन अन्य व्यक्तींना देऊ शकतो का? हा मोठा प्रश्न आहे. यात राजकीय व मोठा प्रशासकीय हस्तक्षेप असल्याशिवाय हे होणे शक्य नाही. एकूणच "तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे करतो", असा पोरखेळ करून कोट्यवधी भाविकांचा अक्षरशः विश्वासघात सुरू आहे. मंदिराची शेकडो एकर जमीन शासकीय अधिकारी, कर्मचारी व भूमाफिया यांनी घोटाळे करून बेकायदेशीरपणे अन्य व्यक्तींच्या नावे करून श्री तुळजाभवानी मंदिराचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे. कायदेशीर कारवाईच्या पोकळ वल्गना करणारे मंदिर प्रशासन, जमिनी चोरणाऱ्यांकडून मंदिराची सर्व भूमी परत मिळवण्यासाठी कायदेशीर लढा उभारणार आहे का, हा खरा प्रश्न आहे.


प्रश्न हाही आहे की, प्रचंड शासकीय यंत्रणा व नियंत्रण असताना गेली अनेक वर्षे मंदिर प्रशासनाला स्वतःची हजारो एकर जमीन पुन्हा मिळवण्याचे प्रयत्न का करता आले नाहीत? जी यंत्रणा मंदिराची मालमत्ता सुरक्षित ठेवू शकत नाही आणि जी भ्रष्टाचाऱ्यांना शासन करण्यास असमर्थ ठरते, ते मंदिर प्रशासन खरोखरच मंदिराचा कारभार योग्य प्रकारे हाताळू शकेल का?

असाच प्रकार 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'च्या बाबतीतही आमच्या लक्षात आला होता, तिथे देवस्थानच्या मालकीच्या २५,००० एकर जमिनीपैकी सुमारे ८,००० एकर जमिनीचा अधिकृत रेकॉर्ड गायब झालेला आहे. पंढरपूर देवस्थानकडेही १,२०० एकर जमीन असताना त्यातून मंदिराला एक रुपयाचेही उत्पन्न मिळत नव्हते. अखेर हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु विधीज्ञ परिषद यांनी कायदेशीर लढा देऊन ती १,२०० एकर जमीन पुन्हा मंदिराला मिळवून दिली.

तुळजापूर प्रकरणातही मंदिराची भूमी लाटणाऱ्या आणि दानपेटीत डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलो आहोत. ४,१२२.०७ एकर जमीन मंदिराची असतांना केवळ ४०० एकर असल्याचे सांगून मंदिर प्रशासन जमीन लाटणाऱ्यांनाच पाठीशी घालत आहे का, असा संशय निर्माण होत आहे. मंदिराची जमीन बळकावणाऱ्यांना आई तुळजाभवानी योग्य ते शासन करेलच, पण जोपर्यंत ही सर्व जमीन अतिक्रमणमुक्त होऊन मंदिराच्या ताब्यात येत नाही, तोपर्यंत आमचा हा कायदेशीर लढा असाच सुरू राहील !




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

महाराष्ट्र शासन

### ३१ ऑगस्टपर्यंत कलम १६३ लागू

मुंबई (दैनिक संध्या) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची वाढती गर्दी, संभाव्य अपघात तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील प्रमुख पर्यटनस्थळांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा आदेश ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. या आदेशानुसार मावळ तालुक्यातील मौजे लोणावळा परिसरातील भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, तुंग किल्ला, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट , शिवलिंग पाईन्ट, एकविरा देवी कार्ला लेणी तसेच पवना धरण परिसर या प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी आदेश लागू करण्यात आली आहेत. पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी जाणे, पाण्यात उतरणे, वाहतूक कोंडी, सार्वजनिक शांततेचा भंग आणि अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने ही प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे. प्रशासनाने पर्यटकांना आदेशातील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले असून, धोकादायक कडे, धबधबे आणि पाणीसाठ्यांच्या परिसरात सुरक्षिततेची काळजी घेण्यास सांगितले आहे. तसेच प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

### ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस

मुंबई (दैनिक संध्या) : जिल्ह्यानिहाय पावसाच्या दुपारी ४ वाजेपर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रात ३१.७ मिमी सरासरी पावसाची नोंद झाली आहे. या कालावधीत सर्वाधिक पाऊस ठाणे (१९६.९ मिमी) जिल्ह्यात नोंदवला गेला; त्यानंतर पालघर (१८५.४ मिमी), रायगड (१३४.१ मिमी), मुंबई उपनगर (१२५ मिमी), पुणे (६९.४ मिमी) आणि मुंबई शहर (६२.१ मिमी) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. १ जूनपासून आतापर्यंत रायगड जिल्ह्यात सर्वाधिक एकूण पावसाची (१,४८०.७ मिमी) नोंद झाली आहे. त्यानंतर पालघर (१,२१५.४ मिमी), रत्नागिरी (१,२७३.४ मिमी), ठाणे (१,१०३ मिमी) आणि सिंधुदुर्ग (१,००१.४ मिमी) या जिल्ह्यांचा क्रम लागतो. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर येथे अनुक्रमे ५१०.७ मिमी आणि ५१२.७ मिमी एकूण पावसाची नोंद झाली आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मान्सून सक्रिय असल्याचे दिसून येत असून राज्याच्या बहुतांश भागांत पावसाचे प्रमाण चांगले आहे. मुसळधार पावसामुळे, मान्सून महाराष्ट्रात सक्रिय असल्याचे आशादायक चित्र आहे.

### दुर्घटनांमध्ये सतर्कता बाळगण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यभरात पावसाचा जोर कायम असून पावसाची संबंधित दुर्घटनांमध्ये सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. वीज पडणे, दरडी कासळणे, झाडे पडणे पूर व तत्सम दुर्घटनांमध्ये जीवित आणि वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासन विविध उपाययोजना करत असून नागरिकांना सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार अतिवृष्टीमुळे सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, सातारा आणि पुणे जिल्ह्यांत दरडी कोसळणे आणि चिखलाचा प्रवाह (मडफ्लो) यांसारख्या घटनांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. वीज अंगावर पडून नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर, नांदेड, धुळे, जळगाव, जालना, पुणे, चंद्रपूर, सोलापूर, यवतमाळ, नागपूर, गडचिरोली, भंडारा, वर्धा, लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि नंदुरबार या जिल्ह्यांत २३ जणांचा मृत्यू झाला आणि १७ जण जखमी झाले. झाडे पडण्याच्या घटनांमुळे अहिल्यानगर, पुणे, सातारा, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, भंडारा आणि अकोला या जिल्ह्यांत सहा जणांचा मृत्यू झाला तर १२ जण जखमी झाले. या घटनांमध्ये ११ प्राण्यांचा मृत्यू झाला आणि सात प्राणी जखमी झाले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणादायी

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांना शिक्षण, सन्मान, समान संधी आणि न्याय मिळावा यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. डॉ. आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या 81 व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यपालांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आपल्याला समाजातील विषमता, जातीयवाद, उच्च-नीचतेची भावना तसेच स्त्री-पुरुष भेदभाव मिटवण्याचा संदेश देतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम आणि सशक्त व्हावी यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाला समान संधी आणि आत्मसन्मान देणारा भारत घडविणे हीच डॉ. आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल.

'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी तसेच भारताला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकास सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटक विकासाच्या प्रवाहात सहभागी झाल्यास हे ध्येय सध्या होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.

# परिवहन खात्यातील भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवा

■ मुंबई (दै. संध्या)



■ त्यांच्यावर तात्काळ कारवाईची काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची मागणी

विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

वडेट्टीवार यांनी सभागृहात सांगितले की, परिवहन खात्यात चौकशी सुरू असतानाही संबंधित अधिकारी पुन्हा त्याच प्रकारचे धंदे सुरू करत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करण्यात यावी आणि त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना परिवहन मंत्र्यांनी सांगितले की,आरटीओ विभागातील कथित गैरव्यवहारांप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी सुरू आहे. रविंद्र भुयार प्रादेशिक परिवहन अधिकारी योगेश मोरे आणि आनंद मोड मोटार वाहन निरीक्षक यांच्याविरोधातील आरोपांची गंभीर दखल घेण्यात आली असून, या अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याची घोषणा केली.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी आयपीएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले की, वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांची गंभीरता लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांना आजपासून सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येत आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल.

## २४ तासांत ७१.४ मिमी पावसाची नोंद

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात मान्सून सक्रिय असून यंदाच्या पावसाळ्यात १ जून पासून राज्यात सरासरी ३३२ मिमी पाऊस झाला आहे, अशी माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत दिलेल्या प्राप्त माहितीनुसार मागील २४ तासांत रायगड जिल्ह्यात सर्वाधिक ७१.४ मिमी पाऊस झाला. कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची नोंद झाली आहे. त्याखालोखाल ठाणे, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ३७.२ मिमी, तर मुंबई उपनगर जिल्ह्यात ३२.४ मिमी, रत्नागिरीमध्ये ३७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# 'एक तालुका–एक क्लस्टर' योजनेच्या अंमलबजावणीला ब्रेक !

१९१ तालुके अजूनही औद्योगिक समूहाविना – आमदार सत्यजीत तांबे

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र विधानपरिषदेत नियम ९३ अंतर्गत उपस्थित केलेल्या सूचनेद्वारे आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्यातील 'औद्योगिक समूह (क्लस्टर) विकास योजना' आणि 'एक तालुका – एक क्लस्टर' योजनेच्या रखडलेल्या अंमलबजावणीचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. एमआयडीसी नसलेल्या व औद्योगिक विकासापासून वंचित असलेल्या तालुक्यांना चालना देण्यासाठी सुरू करण्यात आलेली ही योजना आजही अपेक्षित गतीने राबविली जात नसल्याने राज्यातील ३५५ पैकी तब्बल १९१ तालुके औद्योगिक समूहाविना असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आमदार तांबे म्हणाले की, केंद्र सरकारने २००९-१० मध्ये सुरू केलेली आणि राज्याने २०१३-१४ पासून स्वीकारलेली 'एक तालुका – एक क्लस्टर' योजना ही प्रत्येक तालुक्यात स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मिती वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. मात्र जवळपास दोन दशके उलटूनही या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे चित्र आहे.

सरकारच्या उत्तरात १८३ प्रकल्प मंजूर झाल्याचा आणि त्यापैकी १२४ प्रकल्प कार्यान्वित झाल्याचा दावा करण्यात आला असला, तरी या आकडेवारीबाबत शंका व्यक्त करत आमदार तांबे यांनी संबंधित प्रकल्पांची तालुकानिहाय यादी सभागृहासमोर सादर करण्याची मागणी केली. "जर १२४ प्रकल्प प्रत्यक्षात सुरू असतील, तर ते कोणत्या तालुक्यांमध्ये कार्यरत आहेत, याची माहिती सरकारने द्यावी," असे त्यांनी स्पष्ट केले.



संगमनेरसारख्या एमआयडीसी नसलेल्या तालुक्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, अशा भागात क्लस्टर उभारले असते तर स्थानिक उद्योगांना चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली असती. त्यामुळे उर्वरित तालुक्यांमध्ये ही योजना राबविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली जाणार का आणि संगमनेरसह वंचित तालुक्यांमध्ये क्लस्टर नेमके कधी सुरू होणार, याबाबत उद्योग मंत्र्यांनी स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यात १८६ क्लस्टर प्रकल्प मंजूर असून त्यांची एकूण किंमत १,९१६.१५ कोटी रुपये असल्याचे सांगितले. त्यापैकी १२४ प्रकल्प कार्यान्वित झाले असून राज्य आणि केंद्र सरकारकडून मिळून ९२६.६७ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. या प्रकल्पांमधून सुमारे ३० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. प्रत्येक तालुक्यात क्लस्टर उभारता आले नसल्याची वस्तुस्थिती मान्य करताना मंत्री सामंत यांनी अनुदानाच्या प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, लाभार्थ्यांकडून आवश्यक स्वहिस्सा भरण्यात येणाऱ्या अडचणी तसेच यंत्रसामग्री आयातीसंदर्भातील प्रक्रियेमुळे काही प्रकल्पांना विलंब होत असल्याचे सांगितले. या अडचणी दूर करून 'एक तालुका – एक क्लस्टर' ही संकल्पना भविष्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी सभागृहात दिली.

# अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाची कामगिरी अभिमानास्पद – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

■ मुंबई (दै. संध्या)

दृष्टिहीन महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाची वाटचाल दाखवणाऱ्या 'देख ले! इंडिया' या माहितीपटाचे युनिसेफतर्फे लोकभवन येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शन करण्यात आले. भारताच्या अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या विविध सदस्यांसह हा माहितीपट पाहून त्यांनी संपूर्ण संघाला आणि खेळाडूंना कौतुकाची थाप दिली. दृष्टिहीन खेळाडूंना सहानुभूती नको तर संधी हवी असते असे सांगून अंधांच्या महिला क्रिकेट संघाची वाटचाल तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील विजय दाखवणारा माहितीपट प्रेरणादायी आहे. या माहितीपटाचा आणखी एक प्रयोग लोकभवन येथे आयोजित करून विविध क्षेत्रातील मान्यवरांना तो पाहण्यास निमंत्रित करण्यात येईल, असे राज्यपालांनी सांगितले. माहितीपट निर्माते मुकुंद मूर्ती यांनी सांगितले की, या माहितीपटातून अंध महिला क्रिकेटपटू विशेष आवाज करणाऱ्या चेंडूच्या साहाय्याने क्रिकेट कसे खेळतात, याची माहिती समाजाला मिळते. या संघातील खेळाडू अतिशय प्रतिकूल सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून पुढे आल्या असून, त्यांच्या उल्लेखनीय प्रवासाचे दस्तऐवजीकरण या चित्रपटातून करण्यात आले आहे. हा चित्रपट केवळ क्रिकेटविषयी नाही, तर धैर्य, मैत्री आणि आत्मविश्वासाविषयी आहे. या तरुणींनी सामाजिक, आर्थिक किंवा शारीरिक अशा कोणत्याही अडथळ्यावर दृढनिश्चयाच्या बळावर मात करता येते, हे सिद्ध करून दाखवले आहे. भारतीय अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या उपकर्णधार गंगा कदम यांनी आपल्या अनुभवांना उजाळा दिला. त्या म्हणाल्या "क्रिकेटमुळे माझे आयुष्य बदलले. या खेळामुळे मला आत्मविश्वास, आयुष्याला दिशा आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. इतरांप्रमाणे मला वाचता येत नसल्यामुळे मला पूर्वी खूप वाईट वाटायचे. मात्र आज मी क्रिकेट खेळत असल्याचा अभिमान वाटतो. हा चित्रपट आमच्या संघाचा प्रवास आहे, पण तो प्रत्येक त्या मुलीचीही कहाणी आहे जी विविध अडचणींवर मात करून आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत असते. यावेळी संघातील खेळाडू प्रिया खीर आणि सुषमा पटेल उपस्थित होत्या. क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाचे अध्यक्ष तसेच समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महांतेश जी. किवडसन्नावर यांनी दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी क्रिकेटने उभ्या केलेल्या नव्या संधींचा आढावा घेतला.

# दि.बा.पाटील नामकरणाच्या लढ्यात पोलिसांची दडपशाही

■ विधिमंडळावरील मोर्चा पनवेलमध्येच रोखला!

■ शेकडो भूमिपुत्र ताब्यात; पोलिसांची आंदोलनकर्त्यांसोबत झटापट

■ भाजपा सरकारविरोधी घोषणांनी पनवेल दणाणले!

■ उरण (दै. संध्या)

'लोकशाहीत न्याय मागण्याचाही अधिकार उरला नाही का?' असा संतप्त सवाल करत दि. बा. पाटील नामकरणाच्या मागणीसाठी विधिमंडळावर निघालेला भूमिपुत्रांचा मोर्चा बुधवारी सकाळी पनवेलमध्येच पोलिसांनी रोखला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी हजारो प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र, महिला, तरुण आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते एकवटले असताना पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करून आंदोलनकर्त्यांना अक्षरशः घेरले. मोर्चा सुरू होताच आंदोलकांना ताब्यात घेण्यास सुरुवात झाली आणि शांततेने होणाऱ्या आंदोलनाला पोलिसी कारवाईचे गालबोट लागले. त्यानंतरही काही आंदोलक सानपाड्यात पोहचलेच!

सरकारने लोकशाही मार्गाने होणाऱ्या आंदोलनालाच घाबरून दडपशाहीचा मार्ग स्वीकारल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला असून, पनवेल शहरात दिवसभर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर घोषणांचा गजर, पोलिसांशी शाब्दिक चकमक, महिलांचा आक्रोश आणि आंदोलकांना पोलिसांच्या वाहनांत बसविण्याची धावपळ अशा घडामोडींमुळे संपूर्ण परिसर काही काळ रणांगण बनले होते.



तत्पूर्वी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सकाळी मोर्चाला प्रारंभ होणार होता. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून उपोषणकर्त्या रश्मिता पोपेटा यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून विधिमंडळाकडे पायी कूच करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता. मात्र पोलिसांनी सकाळीपासून पनवेल शहराला वेढा घातला होता. जागोजागी पोलिस अधिकारी आणि कर्मचारी तैनात केले होते. मोर्चाला प्रारंभ होताच पोलिसांनी त्यांना अडवले आणि ताब्यात घेण्यास सुरुवात केली. यावेळी महिलांनी आणि युवकांनी 'विमानतळाला नाव फक्त दिबांचेच', 'जब जब सरकार डरती है, पोलिस को आगे करती है', 'भाजपा सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पाय' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. काही आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने हटवून वाहनांमध्ये बसविले. यावेळी अनेक ठिकाणी शाब्दिक वाद झाले, काही ठिकाणी धक्काबुक्की आणि झटापटही झाली.

या आंदोलनात महिला संघटना, कलाकार संघटना, बैलगाडा संघटना, २७ गाव संघटना, १० गाव संघटना, विविध सामाजिक संस्था, औषध विक्रेते संघटना, आगरी समाजाच्या विविध संघटना, शेतकरी आणि प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक महिला हातात फलक घेऊन आंदोलनात उतरल्या होत्या.

विशेष म्हणजे, आंदोलनकर्त्यांनी पोलिस प्रशासनाकडे नियमानुसार मोर्चासाठी परवानगी मागितली होती. सुरुवातीला मोर्चा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून काढण्याचा प्रस्ताव होता. पोलिसांच्या सूचनेनुसार आयोजकांनी मार्गात बदल करून पनवेलच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मोर्चा काढण्याचे मान्य केले. तरीदेखील अंतिम क्षणी परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली.

### रश्मिताच्या उपोषणाने पेटला वणवा

रश्मिता पोपेटा यांनी केलेल्या उपोषणानंतर दि. बा. पाटील नामकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला होता. सरकारने वेळोवेळी आश्वासने दिली आहेत. मात्र कोणतीही ठोस हालचाल न झाल्याने नामकरण समितीने विधिमंडळावर पायी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. गेल्या दोन आठवड्यांपासून पनवेल, उरण आणि परिसरातील गावागावांत बैठका घेऊन या मोर्चाची तयारी करण्यात आली होती. हजारो लोक विधिमंडळावर पायी जाणार असल्याने प्रशासनानेही मोठी तयारी केली होती. मात्र मोर्चा सुरू होण्याआधीच पोलिसांनी संपूर्ण नियोजन उधळून लावले.

परवानगी द्यायची नव्हती तर मार्ग बदलण्यास का सांगितले? सरकारला नेमकी भीती कशाची आहे? असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. सरकारला भूमिपुत्रांचा आवाज दाबायचा आहे. लोकशाहीतील आंदोलनाचा घटनात्मक अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व उपोषणकर्त्या रश्मिता पोपेटा यांनी केले. लोकनेते 'दिबा' प्रेमी नामकरण समितीचे नेते खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. मोर्चाला सुरुवात होण्यापूर्वीच पोलिसांनी प्रमुख नेत्यांना ताब्यात घेतल्याने आंदोलन चिरडण्याचा पोलिसांचा डाव उघडकीस आला. माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पोलिस प्रशासनावर थेट निशाणा साधताना सांगितले की, यापूर्वीही रायगडमध्ये अनेक आंदोलने केली आहेत. सर्व आंदोलनांना परवानगी मिळतेच असे नाही. मात्र यावेळी पोलिसांची भूमिका दडपशाहीची असून ती निषेधार्ह आहे. आम्ही आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहोत.

खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनीही सरकारवर कठोर शब्दात टीका केली. 'नवी मुंबई विमानतळासाठी आपल्या जमिनी दिलेल्या भूमिपुत्रांची ही लढाई आहे. या लढ्याला पोलिसी बळाने थांबवता येणार नाही. दि. बा. पाटील यांच्या नावासाठीचा संघर्ष आणखी तीव्र होईल,' असा इशारा त्यांनी दिला.

विशेष म्हणजे, सत्ताधारी महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी या आंदोलनापासून अंतर राखले. त्यामुळे विरोधकांनी सरकारवर राजकीय हेतूने आंदोलन दडपल्याचा आरोप केला. सत्ताधारी पक्षातील आमदारांनी या आंदोलनाबाबत मौन बाळगल्याने भूमिपुत्रांनी त्यांचा शिवराळ शब्दात धिक्कार केला..

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जिल्ह्यातील क्रमांक एकची शाळा होण्याकडे केसनंद जि.प. शाळेची झेप

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील केसनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विद्यार्थीसंख्येच्या बाबतीत जिल्ह्यातील क्रमांक एकची शाळा बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. यंदा शाळेत जवळपास १,७०० विद्यार्थी शिक्षण घेत असून, आवश्यक भौतिक सुविधा उभारून वाबळेवाडी पॅटर्नच्या धर्तीवर ही शाळा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील आदर्श शाळा म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास पुणे जिल्हा परिषद सदस्या व शिक्षण समिती सदस्या सुरेखा रमेश हरगुडे यांनी व्यक्त केला. केसनंद जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत आयोजित सहविचार सभेत त्या बोलत होत्या. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच मार्गदर्शक शिक्षिका रुपाली शिंदे, स्मिता उदार आणि हर्षदा म्हाळसकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सभेत शाळेतील विविध समस्या, आवश्यक सुविधा आणि त्यावरील उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय यावेळी घेण्यात आले. मुख्याध्यापक सूर्यवंशी यांनी विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असल्याचे सांगत, केसनंद शाळेची उज्वल आणि यशस्वी परंपरा आगामी काळातही अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी शिवसेना तालुका पदाधिकारी व दक्षता समिती अध्यक्षा अलका सोनवणे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश वाबळे, माजी अध्यक्ष गणेश हरगुडे, युवा नेते प्रकाश हरगुडे, एक साथ ग्रुपचे सचिव ज्ञानेश्वर पाटेकर, सामाजिक कार्यकर्ते विजय हरगुडे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल वाडेकर, प्रास्ताविक शिवाजी भोरडे, तर आभार प्रदर्शन मंगेश येवले यांनी केले.

### नितीन कोलते यांना पीएच.डी. पदवी प्रदान



खळद (दैनिक संध्या) : न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी संशोधन केंद्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या शैक्षणिक यशामध्ये संशोधक नितीन कोलते यांना दि. ६ जुलै २०२६ रोजी हिंदी विषयातील 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.)' ही पदवी प्रदान करण्यात आली. श्री. कोलते यांनी "श्रीलाल शुक्ल एवं सुभाष भेंडे के उपन्यासों में मूल्य संक्रमण : एक तुलनात्मक अध्ययन" या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनामध्ये हिंदी आणि मराठी साहित्यातील दोन महत्त्वाच्या कादंबरीकारांच्या साहित्याच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, नैतिक आणि धार्मिक मूल्यांतील संक्रमणाचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. मौखिक परीक्षा (Viva-Voce) यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी बहाल करण्यात आली. या संशोधनकार्याला न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. हनुमान जगताप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे आणि सातत्यपूर्ण प्रेरणेमुळे संशोधकाला ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी साध्य करता आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी श्री. नितीन कोलते यांचे अभिनंदन करताना, संशोधनाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा देणे हे उच्च शिक्षणाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट असल्याचे सांगितले. ही उपलब्धी महाविद्यालय तसेच हिंदी संशोधन केंद्रासाठी गौरवास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पदाचा उपयोग योग्य कामासाठी व्हावा - कमलाकर सातव



चाकण (दैनिक संध्या) : तळागाळातील जनतेच्या भावनांची जाणीव असलेल्या पदाधिकाऱ्यांनी पदाचा उपयोग योग्य कामासाठी करावा, असे आवाहन काँग्रेस कमिटीचे पुणे जिल्हाध्यक्ष कमलाकर सातव यांनी व्यक्त केले. चाकण येथे चंद्रकांत गोरे यांची खेड तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल व नूतन पदाधिकाऱ्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. त्यावेळी सातव बोलत होते. याप्रसंगी माजी अध्यक्ष विजय डोळस, पुणे जिल्हा अल्प संख्याकचे अध्यक्ष जमीर काझी, महिला काँग्रेसच्या प्रदेश सदस्या वंदना सातपुते, चाकण शहर अध्यक्ष आनंद गायकवाड, आळंदी शहराध्यक्ष संदीप नाईकरे, सुभाष होले, पंडितराव पवार, गणेश म्हसे, सुनील मिंडे, काळूराम कड, रमेश गोरे, अर्जुन गोरे, बबन टिळेकर, नंदू गोरे, लक्ष्मण वाघ, मोमीन काजी, सचिन पानसरे, मयूर गोरे, अनिल देशमुख, संजय सासवडे, राजेंद्र जगनाडे, राम गोरे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मार्ग बिकट

लोणी काळभोर (दै. संध्या)



पुर्व हवेलीत संत तुकाराम महाराजांची पालखी ११ जुलै रोजी येत असुन पालखी मार्गावरील अनेक अडथळे अजुनही दूर न झाल्याने पुणे - सोलापूर महामार्गावरुन जाणाऱ्या संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मार्ग बिकट झाला असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. पुणे - सोलापूर हा महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने असुरक्षित असुन कचरा, पाण्याची टंचाई, तुटलेल्या जाळया, महामार्गावर माती अशा अनेक समस्यांनी हा महामार्ग ग्रासला आहे. पालखी मार्गावर सर्वत्र शेवाळेवाडी पासुन ते उरुळी कांचन पर्यंत अनेक ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य पसरले असुन चार दिवसावर पालखीचे आगमन पुणे - सोलापूर महामार्गावर होणार असून त्यापुर्वी येणाऱ्या वारकऱ्यांच्या सुविधेचा विचार केला तर अजुनही महामार्गाची स्वच्छता कुठेच दिसुन येत नाही .अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पालखी महामार्गाच्या कडेला साठले असुन ग्रामपंचायतीचे पुर्ण पणे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे वारकऱ्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. पालखी मार्गावरील कचरा वेळोवेळी उचलला जात नसल्याने त्याचा परिणाम म्हणून सर्वत्र दुर्गंधी, घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे . लोणी काळभोर, कदमवाकवस्ती येथील पालखी तळाची पाहणी आतापर्यंत अनेक अधिकारी, आमदार माऊली कटके यांनी केली व तयारीचा घेतला आढावा घेऊन काही सुचना दिल्या. पण अधिकारी नुसतेच पालखी तळाला भेट देऊन सुचना करत आहेत .परंतु एकही अधिकारी संत तुकाराम महाराजांची पालखी ज्या महामार्गावरुन जाणार असुन तो महामार्ग वारकऱ्यांच्या साठी सुरक्षित आहे का याची खातरजमा केलेली दिसत नाही अशी नागरिकांच्या मध्ये चर्चा आहे.

पुणे - सोलापूर महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने असुरक्षित झाला असुन तिथे कसल्याही प्रकारची सोय संत तुकाराम महाराजांच्या पालखीसाठी चालू नाही .कदमवाकवस्ती व लोणी काळभोर हद्दीतील महामार्गाच्या मधोमध लावण्यात आलेल्या लाईटच्या खांबावर विविध प्रकारच्या जाहिरातीचे बँनर लावलेले आहेत. ते वाकडे झाले असुन खाली पडत आहेत. त्यामध्ये खिळे असल्याने वारकऱ्यांच्या पायात ते खिले घुसून वारकऱ्यांच्या पायाला जखम होण्याची शक्यता नाकारता येत नाही .त्यामुळे महामार्गावरील सर्व ग्रामपंचायतीने बँनर काढले पाहिजेत अशी मागणी नागरिक करत आहेत .तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल जमा झाला असुन पालखी काळात जर अजून पाऊस आला तर वारकऱ्यांना चिखल तुडवत पुणे -सोलापूर महामार्गावरुन जावे लागेल. ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला लावलेल्या जाळया वेड्या वाकडया झाल्या असुन त्या जाळ्यांमुळे वारकरी जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनेक ठिकाणी रस्त्यावर चढउतार असल्यामुळे वारकऱ्यांना चालताना कसरत करावी लागणार आहे. दोन तीन दिवसापासून सुरु असलेल्या पावसाने रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी साठले असुन पाणी काढण्याचे कसल्याही प्रकारचे नियोजन अजुन झाले नाही .चिखल पण तसाच पालखी महामार्गावर आहे .त्यामुळे पालखीची वाट यंदा बिकट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

**पुढारी फक्त पुढारपण घेण्यासाठी ऐनवेळी उपलब्ध पण?**

हडपसर ते उरुळी कांचन पर्यंत हवेली तालुक्याची हद्द असुन जागोजागी बँनर लागले, कमानी टाकुन झाल्या, मंडपाचे काम चालू आहे. तसेच वारकऱ्यांना पदार्थ वाटण्यात येण्यासाठी स्टेज उभे राहत असुन तुटलेल्या जाळया, महामार्गावर झालेला चिखल, रस्त्यावर पसरलेली खडी, उडणारा धुरळा, जागोजागी उगवलेली काटेरी झुडपे, महामार्गावर पडलेले खड्डे यामुळे वारकऱ्यांना होणारा त्रास कुठल्याही पुढाऱ्याला दिसत नसुन पुढारी फक्त पुढारपण घेण्यासाठी बँनर वर दिसतात व ऐनवेळी उपलब्ध होतात अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

## शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

सासवड (दै. संध्या)

**२ विद्यार्थी ठरले शिष्यवृत्तीधारक**





महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची मोहोर उमटवली आहे. या परीक्षेत विद्यालयातील एकूण ६१ विद्यार्थी पात्र ठरले असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीधारक होण्याचा बहुमान मिळवला आहे.

यंदाच्या परीक्षेत इयत्ता ५ वीचे ४३ आणि इयत्ता ८ वीचे १८ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, इयत्ता ५ वी मधील आरोही रामदास जगताप (२३२ गुण) आणि अद्विक अभय सस्ते (२३२ गुण) या दोन विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत शिष्यवृत्ती मिळवली आहे. या प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला शासनाकडून १५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख श्रीमती रेणुका सिंग, प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, उपप्राचार्या सौ. सुषमा रासकर आणि शिष्यवृत्ती परीक्षा प्रमुख मयुरी कामथे यांनी आनंद व्यक्त केला आहे. या यशासाठी शाळेतील शिक्षक शलाका कामथे, ओंकार कदबाने, राजेश्वरी निकम, साधना राऊत, सुषमा वढणे आणि नीलम झेंडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, माजी आमदार संजयजी जगताप, विश्वस्त डॉ. राजेंद्रबापू जगताप, डॉ. एम. एस. जाधव, सोनालीताई शिंदे, राजवर्धनी जगताप, डॉ. अस्मिता जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी, कानिफनाथ अमराळे आणि रवींद्रपंत जगताप यांनी यशस्वी विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले आहे. या यशाने सासवड परिसरात शैक्षणिक वर्तुळातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## पुण्यात रंगला ट्रान्सजेंडर समुदाय आणि 'रेस्क्यू मांजरींचा' अनोखा उत्सव

पुणे (दै. संध्या)

प्राइड मंथच्या निमित्ताने पुण्यात मनाला स्पर्श करणारा एक कार्यक्रम पार पडला, ज्याचे नाव होते 'पुर्राईड वॉक २०२६' (Purrride Walk 2026). या आगळ्यावेगळ्या उपक्रमाने समाजातील अशा दोन घटकांना एकाच व्यासपीठावर आणले, ज्यांना नेहमीच सामाजिक स्वीकारासाठी आणि सन्मानासाठी मोठा संघर्ष करावा लागतो—एक म्हणजे 'ट्रान्सजेंडर समुदाय' आणि दुसरा म्हणजे 'रस्त्यावरून वाचवलेल्या (रेस्क्यू केलेल्या) मांजरी'. चिटोज फाउंडेशन, किन्नर गरिमा फाउंडेशन, मॅक्सवेल इंटरनॅशनल पेट केअर आणि सकाळ पेटोपिया यांनी एकत्रित येऊन या सुंदर सोहळ्याचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमामागे एकच अत्यंत साधा आणि प्रभावी विचार होता. या जगातील प्रत्येक जीवाला सन्मानाने, प्रेमाने आणि आपलेपणाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. कार्यक्रमात प्राची, सना, झोया, आलिया, माहिरा आणि सारा या ट्रान्सजेंडर समुदायातील सहा सदस्यांनी रस्त्यावरून वाचवलेल्या आणि जखमी अवस्थेतून बऱ्या झालेल्या मांजरी व त्यांच्या लहान पिल्लांसोबत रॅम्प वॉक केला. ट्रान्सजेंडर व्यक्ती आणि या मुक्या प्राण्यांच्या आयुष्याचा प्रवास वेगळा असला, तरी दोघांनीही समाजात राहून तिरस्कार, पूर्वग्रह आणि नाकारले जाणे काय असते, हे अनुभवले आहे.

## वारकऱ्यांना पाच टन मोतीचूर लाडू व चार हजार पाणी बॉटलचे वाटप

पारगाव (दै. संध्या)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी भोसरी येथील संत ज्ञानेश्वर मित्र मंडळ व इंद्रायणी मंगल कार्यालय यांच्या वतीने वारकरी भाविक भक्तांना पाच टन मोतीचूर लाडू व चार हजार पाणी बॉटल वारकऱ्यांच्या सेवेसाठी वाटप करण्यात आले. आळंदी विश्रांतवाडी रस्त्यावरील मॅक्झिनचौकामध्ये आज गुरुवारी सकाळी हे वाटप करण्यात आले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण गवळी व आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे अध्यक्ष राहुल ज्ञानेश्वर गवळी, सचिन लांडगे, साहेबराव वाळके, चंद्रकांत वाळके, किसनराव शिंदे, बापूसाहेब काचोळे, ज्ञानेश्वर विधाटे, दिलीप भोंडवे, काळूराम कानूरकर, जंगल फुगे, नारायण गंगावणे. नगरसेवक सागर गवळी, पांडुरंग गवळी, संदीप गवळी व श्री गणेश तरुण मित्र मंडळातील सर्व कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

## समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप

जुन्नर (दै. संध्या)




"वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा" या उदात्त भावनेतून समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर बेल्हे, यांच्या वतीने चैतन्य महाराज ओतूर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यानिमित्त राजूरी येथे वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पायी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक थकवा, सांधेदुखी, पायदुखी, सर्दी, ताप, रक्तदाब तसेच इतर किरकोळ आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार आयुर्वेदिक औषधांचे मोफत वितरण करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.

समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या सेवाभावी उपक्रमामुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. या उपक्रमाचे नियोजन समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ. संजय लोंढे, डॉ. रमेश पाडेकर, डॉ. मधुसूदन कुऱ्हाडे, डॉ. रश्मी चव्हाण, डॉ. श्रवंती तोडचिरकर, डॉ. जयश्री मते, डॉ. कृतिका कांबळे, डॉ. स्नेहल गायकवाड तसेच प्रा. मानसी गवळी, यशवंत फापाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या सेवाभावी उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्राचार्य डॉ. संजय लोंढे तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी आयोजकांचे अभिनंदन करत समाजहितासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.

समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने वारकरी संप्रदायाच्या सेवेतून सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण करत 'सेवा, संस्कार आणि समर्पण' या मूल्यांचा प्रत्यय पुन्हा एकदा समाजाला करून दिला.

# शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा

**मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना उद्या निवेदन सादर करणार**



जेजुरी (दै. संध्या)

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि खाजगी शाळांतील शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा भार, टीईटी अनिवार्यता, SIR मोहीम, बीएलओ नियुक्ती, अनुदानित शाळांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना तसेच इतर विविध प्रलंबित मागण्यांबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्याध्यक्ष तानाजी माने तसेच राज्यसचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी दिली.

या निवेदनाद्वारे राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. शिक्षण हा राज्याच्या विकासाचा कणा असताना शिक्षकांना सातत्याने बीएलओ, SIR मोहीम आणि इतर अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या नियमित अध्यापनावर गंभीर परिणाम होत आहे.

अनेक शाळांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असतानाही शिक्षकांना विविध शासकीय कामांसाठी कार्यमुक्त करण्यात येत असल्याने शैक्षणिक व्यवस्था विस्कळीत होत असून विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात येणार आहे.

निवेदनामध्ये टीईटी अनिवार्यतेबाबत न्याय्य व व्यवहार्य निर्णय घेण्याची मागणी करण्यात येणार असून, SIR मोहीम, बीएलओ आणि इतर अशैक्षणिक कामांसाठी स्वतंत्र पर्यायी यंत्रणा उभारावी, राज्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरावीत, टप्पा अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदान मंजूर करून वितरित करावे तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशा प्रमुख मागण्यांचा समावेश असणार आहे.

याशिवाय मराठी व इतर अनुदानित शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी संचमान्यतेचे विद्यमान निकष वास्तव परिस्थितीनुसार शिथिल करावेत, बीएलओ नियुक्ती करताना शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, एकूण शिक्षक संख्येच्या एक चतुर्थांशपेक्षा अधिक शिक्षकांना बीएलओची जबाबदारी देऊ नये तसेच मुख्याध्यापकांना शक्यतो ही जबाबदारी देऊ नये, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात येणार आहे.

शिक्षणाशी संबंधित कोणतेही महत्त्वाचे धोरण किंवा निर्णय घेण्यापूर्वी राज्यातील शिक्षक संघटनांशी सविस्तर चर्चा करून सर्वमान्य निर्णय घ्यावेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित सर्वोच्च मानून शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षाही या निवेदनातून व्यक्त करण्यात येणार आहे.

निवेदनाच्या शेवटी शिक्षक हा राष्ट्रनिर्मितीचा प्रमुख घटक असल्याचे अधोरेखित करून शासनाने संवेदनशील भूमिका घेत शिक्षकांच्या सर्व प्रलंबित मागण्यांवर तात्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभरातील शिक्षकांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नसल्याचा इशाराही देण्यात येणार असल्याचे राज्याध्यक्ष तानाजी माने तसेच राज्यसचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी सांगितले.

## मुसळधार पावसामुळे सोयाबीन आणि भाजीपाल्यावर बुरशीजन्य रोगांचे संकट

नारायणगाव (दै. संध्या)



माळशेज आणि जुन्नर परिसरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून, नुकत्याच उगवलेल्या सोयाबीन आणि इतर भाजीपाला पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या परिस्थितीमुळे परिसरातील शेतकरी वर्गात तीव्र चिंतेचे वातावरण पसरले आहे.सतत पडणाऱ्या पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढला आहे. शेतात पाणी साचून राहिल्याने पिकांच्या मुळांना पुरेशी हवा मिळत नाही, ज्यामुळे पिके सडण्याची आणि त्यांची वाढ पूर्णपणे खुंटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ओतूर भागातील प्रगतशील शेतकरी बाबाजी बाळाजी डुंबरे यांनी या गंभीर परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जुन्नर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीचा परिणाम केवळ सोयाबीनवरच नाही, तर भाजीपाला पिकांवरही दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने टोमॅटो, झेंडू, मिरची, कोबी, फ्लॉवर आणि शेपू यांसारख्या पिकांचा समावेश आहे. काही सखल भागांतील पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली असून, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये तलावासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.तलाव,ओढे आणि शेतखाचारांमधील पाणी मोठ्या प्रमाणात वाहून नदीकडे जात आहे. पाण्याचा हा प्रचंड ओघ कायम राहिल्यास नदीपात्रही धोक्याच्या पातळीवर जाण्याची शक्यता आहे.

कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार,पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य औषधांची फवारणी आणि संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सततच्या पावसामुळे निर्माण झालेल्या या ओल्या दुष्काळसदृश परिस्थितीकडे प्रशासनानेही गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.